सभा कामकाजाच्या सुरुवातीस सन्मा.सदस्यांनी खालील प्रमाणे श्रध्दाजंलीचे प्रस्ताव मांडले.

अ.क्र.	सन्मा.सदस्यांचे नांव	श्रध्दांजलीचे प्रस्ताव
१.	सौ.दिपमाला मनोज काळे, मा.महापौर	१)जळगांव शहरातील बहुभाषिक ब्राह्मण संघाचे माजी अध्यक्ष तथा संस्थापक सदस्य कै.लेखराजजी उपाध्याय, २) जळगांव शहर मनपा सन्मा.नगरसेविका सौ.पुजा जगपात यांचे चुलत सासरे कै.जगन बाबुराव जगताप, ३) मुळजी जेठा महाविदयालयाच्या संगीत विभागाचे माजी विभाग प्रमुख कै.अंजली संजय हांडे, ४) जळगांव तालुका पोलीस स्टेशनच्या कॉन्स्टेबल कै.वैशाली भदाणे, ५) मृदंग इंडिया जाहिरात संचालक श्री.अनंत भोळे यांच्या पत्नी कै.ज्योती अनंत भोळे यांचे दुखद: निधनाबद्दल.
२.	डॉ.श्री.चंद्रशेखर शिवाजीराव पाटील, मा.सभापती	१)जळगांव मनपाचे सेवानिवृत्त मुख्यलेखाधिकारी श्री.सुभाष राजाराम वाणी यांच्या पत्नी कै.सौ.सुनंदा सुभाष वाणी, २)श्री.गोपाल, सुदाम व पुरुषोत्तम रुपचंद गोराणे यांच्या मातोश्री तसेच श्री.सुनिल जगन्नाथ गोराणे यांच्या काकू कै.गं.भा.कमलाबाई रुपचंद गोराणे, ३) देवराम नगर येथील कै.वैशाली भाऊसाहेब पाटील, ४)प्रभाग क्र.९ मधील मुक्ताईनगर येथील कै.मनोहर महारु पाटील, ५)प्रभाग क्र.९ मधील निवृत्तीनगर येथील कै.जगन्नाथ भाऊराव सुर्वे, ६)प्रसिध्द चार्टर्ड अकाउंटंट श्री.जयेश भाई दोशी यांच्या मातोश्री कै.हंसाबेन प्रवीणचंद्र दोशी, ७) प्रभाग क्र.९ मधील हर्षवर्धन कॉलनी येथील कै.वैशाली गणेश भदाणे, ८) प्रभाग क्र.९ मधील मुक्ताईनगर येथील कै.सौ.वत्सलाबाई प्रकाश नेरपगार, ९)बैठक हॉल परिसरातील कै.सौ.उषाबाई सुरेश पाटील, १०)मनपा सेवानिवृत्त प्रभाग अधिकारी श्री.प्रकाश बळीराम सोनवणे यांच्या मातोश्री कै.सौ.ध्रुपदाबाई बळीराम सोनवणे यांचे दुखद: निधनाबद्दल.
३.	ॲड सौ.शुचिता अतुलसिंह हाडा	१)जळगांव शहरातील नागरिक आणि अनेक सामाजिक संस्थांशी संलग्न असलेल्या कै.अंजली संजय हांडे, २)दत्त कॉलीनी येथील रहिवासी श्री.महेंद्र पाटील यांचे वडील कै.काशिराम देवाजी पाटील यांचे दुखद: निधनाबद्दल.
४.	सौ.सुरेखा नितीन तायडे	प्रभाग क्र.१३ मधील रहिवासी आणि अनेक सामाजिक संस्थांशी संलग्न असलेल्या कै.अंजली संजय हांडे यांचे दुखद: निधनाबद्दल.

श्रध्दांजली बाबत आलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने उपरोक्त दु:खद घटनेबाबत सभागृहाला अत्यंत दु:ख होत आहे. परमेश्वर इहलोक सोडून गेलेल्या मृतात्म्यास चिरशांती प्रदान करो, त्यांच्या समस्त कुटूंबियांचे दु:खात सभागृह सहभागी असून त्यांचे कुटूंबियांना, मित्र परिवारास दु:ख सहन करण्याची शक्ती प्रदान करो या भावनेसह सभागृहाने दोन मिनीटे शांत उभे राहून दिवगंत आत्म्यांना श्रध्दांजली अर्पण केली.

सही /-
(दिपमाला मनोज काळे)
महापौर
जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव

प्रत कार्यवाहीस्तव
नगरसचिव,महानगरपालिका,जळगांव.

सभा कामकाजाच्या सुरुवातीस सन्मा.सदस्यांनी खालील प्रमाणे अभिनंदनाचे प्रस्ताव मांडले.

अ.क्र	सन्मा.सदस्यांचे नांव	अभिनंदनाचे प्रस्ताव
१.	सौ.दिपमाला मनोज काळे, मा.महापौर	१) मा.ना.श्री.गिरीषभाऊ महाजन, मंत्री जलसंपदा तथा सिंहस्थ यांची नाशिक जिल्हा पालकमंत्री पदी निवड झाल्याबद्दल. २) श्री.महावीर सहकारी बँकेच्या उपाध्यक्ष पदी श्री.स्वरुपकुमार लुंकड यांची निवड झाल्याबद्दल. ३) जळगांव डिस्ट्रिक्ट टॅक्स प्रॅक्टिशनर्स असोसिएशन अध्यक्ष पदी श्री.सुरेश लोढा, मानद सचिव पदी ॲड श्री.नितीन अट्रावलकर, कोषाध्यक्ष पदी श्री.नयन शाह यांची निवड झाल्याबद्दल त्यांचे व नवनिर्वाचित उपाध्यक्ष, सहसचिव, सहकोषाध्यक्ष, सर्व कार्यकारणी सदस्य तसेच या क्षेत्रात सुमारे ३५ वर्षाची उल्लेखनीय सेवा पूर्ण केल्याबद्दल जेष्ठ सदस्य श्री.सुरेश लोढा, श्री.अजित छाजेड व श्री.अविनाश लांडगे यांचे हार्दीक अभिनंदन. ४) जळगांव शहरातील श्री.हर्षल बाविस्कर यांची राज्य कर निरीक्षक पदी नियुक्ती झाल्याबद्दल हार्दीक अभिनंदन.
२.	१) डॉ.श्री.चंद्रशेखर शिवाजीराव पाटील, मा.सभापती २) सौ.रंजना विजय वानखेडे ३) सौ.सुरेखा नितीन तायडे ४) सौ.गायत्री इंद्रजित राणे	१) जामनेर विधासभा मतदारसंघाचे आमदार तथा महाराष्ट्र राज्याचे जेष्ठ नेते मा.ना.श्री.गिरीष दत्तात्रय महाजन साहेब यांची नाशिक जिल्ह्याच्या पालकमंत्रीपदी नियुक्ती झाल्याबद्दल हार्दीक अभिनंदन
३.	श्री.रुद्रेंद्र (दिपक) प्रभाकर सुर्यवंशी	१) श्री महावीर सहकारी बँकेच्या उपाध्यपदी श्री.स्वरुपकुमार लुंकड यांची बिनविरोध निवड झाल्याबद्दल २) जळगांव डिस्ट्रिक्ट टॅक्स प्रॅक्टिशनर्स असोसिएशन अध्यक्ष पदी श्री.सुरेश लोढा, मानद सचिव पदी ॲड श्री.नितीन अट्रावलकर, कोषाध्यक्ष पदी श्री.नयन शाह यांची निवड झाल्याबद्दल त्यांचे व नवनिर्वाचित उपाध्यक्ष, सहसचिव, सहकोषाध्यक्ष, सर्व कार्यकारणी सदस्य तसेच या क्षेत्रात सुमारे ३५ वर्षाची उल्लेखनीय सेवा पूर्ण केल्याबद्दल जेष्ठ सदस्य श्री.सुरेश लोढा, श्री.अजित छाजेड व श्री.अविनाश लांडगे यांचे हार्दीक अभिनंदन.
४.	श्री.भागचंद (अमर) मोतीलाल जैन	१) जळगांव शहरातील सेवानिवृत्त गटशिक्षणाधिकारी श्री.ए.पी.बाविस्कर व सेवानिवृत्त लेखाधिकारी सौ.रत्नप्रभा बाविस्कर यांचे सुपूत्र श्री.हर्षल बाविस्कर यांची राज्य कर निरीक्षक पदी नियुक्ती झाल्याबद्दल हार्दीक अभिनंदन.
५.	सौ.अनिता सुरेश भापसे	मा.आमदार श्री.सुरेश दामु भोळे यांनी जळगांव शहराचा प्रमुख मार्ग असलेल्या अंजिठा चौफुली ते जळगांव विमानतळ रस्तात्यावर आधुनिक LED पथदिवे उभारणेकामी जिल्हा वार्षिक योजनेच्या माध्यमातुन DPDC अंतर्गत ५ कोटी रुपयांचा निधी मंजुरी मिळवुन आणल्याबद्दल तसेच याकामी पालकमंत्री श्री.गुलाबरावजी पाटील साहेब, मा.श्री.गिरीषभाऊ महाजन, केंद्रीय राज्यमंत्री ना.श्रीमती रक्षाताई खडसे, मंत्री ना.श्री.संजयजी सावकारे यांचे मोलाचे सहकार्याबद्दल हार्दीक अभिनंद.
६.	श्री.विजय लक्ष्मण बांदल	वार्ड क्र.२ मधील कामांबद्दल केलेल्या तक्रारींचे चांगल्या प्रकारे निरसन केल्याबद्दल जळगांव मनपाचे आरोग्य अधिकारी व कर्मचारी यांचे हार्दीक अभिनंदन.

उपरोक्त प्रस्तावाचे अनुषंगाने हे सभागृह अभिनंदन करीत असुन त्यांचे उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा देत आहोत.

सही /-
(दिपमाला मनोज काळे)
महापौर
जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव

प्रत कार्यवाहीस्तव
नगरसचिव,महानगरपालिका,जळगांव.

दिनांक ०८/०७/२०२६ बुधवार रोजी दुपारी १.०० वाजता संपन्न झालेल्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त कायम करणे.

असा ठराव करणेंत येत आहे की, दिनांक ०८/०७/२०२६ बुधवार रोजी दुपारी १.०० वाजता संपन्न झालेल्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त कायम करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

सर्वानुमते मंजुर

अनुकुल मते :- ६६ प्रतिकुल मते :- ००

सुचक :- श्री.सुर्यवंशी रुद्रेंद उर्फ दिपक प्रभाकर

अनुमोदक :- श्री.लढ्ढा नितीन बालमुकुंद

सही /-
(दिपमाला मनोज काळे)
महापौर
जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव

प्रत कार्यवाहीस्तव
मा.आयुक्त, महानगरपालिका, जळगांव.

जळगांव शहर महानगरपालिकेच्या न्यायालयीन प्रकरणांमध्ये महानगरपालिकेची प्रभावी, कायदेशीर व सक्षम बाजू मांडण्यासाठी अनुभवी व पात्र विधीज्ञांचे न्यायालयनिहाय पॅनेल गठीत करण्यासाठी "विधीज्ञ पॅनेल नियुक्ती, न्यायलयीन प्रकरण व्यवस्थापन, व कार्यपध्दती नियमावली, २०२६" तसेच अर्जाचे नमुना, घोषणापत्र, हमीपत्र, प्रतिज्ञापत्र नमुने निश्चित करुन अंमलबजावणी करण्यास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

असा ठराव करणेंत येत आहे की, जळगाव शहर महानगरपालिकेच्या कामकाजाच्या स्वरूपानुसार महानगरपालिकेशी संबंधित विविध विषयांवर न्यायालयीन प्रकरण उद्भवत असतात. यामध्ये महसूल, मालमत्ता, कर, गाळे, भाडेपट्टा, जमीन संपादन, नगररचना, कंत्राटे, विकासकामे, कर्मचारी व सेवा विषयक बाबी, कामगार विषयक प्रकरणे, ग्राहक विषयक प्रकरणे, फौजदारी प्रकरणे तसेच विविध न्यायालये व न्यायिक प्राधिकरणांसमोरील प्रकरणांचा समावेश होतो.

अशा न्यायालयीन प्रकरणांमध्ये महानगरपालिकेची बाजू प्रभावीपणे मांडण्यासाठी संबंधित विषयातील अनुभवी, पात्र व कार्यक्षम विधीज्ञांची उपलब्धता, वेळेत न्यायालयीन कार्यवाही करणे, आवश्यक कागदपत्रे व पुरावे सादर करणे, न्यायालयीन आदेशांचे परीक्षण करणे तसेच पुढील कायदेशीर कार्यवाहीबाबत योग्य वेळी निर्णय घेणे अत्यंत आवश्यक आहे.

महानगरपालिकेच्या न्यायालयीन कामकाजाचे प्रमाण व स्वरूप लक्षात घेता केवळ प्रकरणानुसार तात्पुरती कार्यवाही करण्याऐवजी न्यायालयनिहाय व विषयविशेष पॅनेल, निश्चित पात्रता निकष, स्पष्ट जबाबदाऱ्या, कालमर्यादा, अहवाल प्रणाली, हितसंबंध संघर्ष व गोपनीयतेच्या अटी, मानधनाची कार्यपद्धती आणि प्रकरण वाटपाची पारदर्शक व्यवस्था असणे आवश्यक आहे.

कार्यपद्धती व नियमावली तयार करण्याची आवश्यकत्ता :

महानगरपालिकेच्या न्यायालयीन कामकाजात एकसमानता, पारदर्शकता, उत्तरदायित्त्व व कार्यक्षमता निर्माण करण्याच्या दृष्टीने स्वतंत्र कार्यपद्धती व नियमावली निश्चित करणे आवश्यक आहे.

प्रस्तावित नियमावलीमध्ये सर्वोच्च न्यायालय, उच्च न्यायालय, जिल्हा व अधीनस्थ न्यायालये, कामगार व औद्योगिक न्यायालय, सहकारी न्यायालय / प्राधिकरण, जमीन संपादन संदर्भ (LAR), महसूल व कर, मध्यस्थी /लवाद / व्यापारी विवाद / NGT, ग्राहक आयोग, मानव अधिकार आयोग, फौजदारी प्रकरणे तसेच विषयविशेष तज्ज्ञ अशा विविध न्यायालये / विषयांसाठी स्वतंत्र पॅनेलची तरतूद करण्यात आलेली आहे.

त्याचप्रमाणे पॅनेलवरील विधीज्ञांसाठी संबंधित न्यायालयीन कामकाजाचा अनुभव, व्यावसायिक पात्रता, कार्यालयीन व डिजिटल सुविधा, ई- फायलिंग, ई-कोर्ट, व्हिडिओ कॉन्फरन्सिंग इत्यादी बाबींचे निकष निश्चित करण्यात आलेले आहेत.

प्रस्तावित कार्यपद्धती व नियमावलीचा उद्देश :-

प्रस्तावित "विधीज्ञ पॅनेल नियुक्ती, न्यायालयीन प्रकरण व्यवस्थापन, व कार्यपद्धती नियमावली,२०२६" तयार करण्यामागील प्रमुख उद्देश पुढीलप्रमाणे आहेत :-

१. महानगरपालिकेच्या न्यायालयीन प्रकरणांमध्ये अनुभवी व पात्र विधीज्ञांची उपलब्धता सुनिश्चित करणे.

२. न्यायालय व विषयानुसार स्वतंत्र व तज्ञ पॅनेलची निर्मिती करणे.

३. विधीज्ञांची निवड करताना पात्रता, अनुभव, व्यावसायिक क्षमता व संबंधित विषयातील प्रावीण्य यांना प्राधान्य देऊन वस्तुनिष्ठ व पारदर्शक प्रक्रिया निर्माण करणे.

४. प्रत्येक न्यायालयीन प्रकरणाची सुनावणीपूर्व तयारी, कागदपत्रांची पूर्तता व कायदेशीर रणनीती याबाबत उत्तरदायित्व निश्चित करणे.

५. प्रत्येक सुनावणीनंतर न्यायालयीन कामकाजाचा अहवाल, पुढील तारीख, न्यायालयीन आदेश व पुढील कायदेशीर कार्यवाही याबाबत नियमित अहवाल प्रणाली निर्माण करणे.

६. महत्त्वपूर्ण व उच्च आर्थिक दायित्व असलेल्या प्रकरणांमध्ये वरिष्ठ व तज्ज्ञ विधीज्ञांचे मार्गदर्शन उपलब्ध करून देणे.

७. विशेषतः LAR व उच्च मूल्याच्या प्रकरणांमध्ये महानगरपालिकेच्या आर्थिक हिताचे संरक्षण करणे. प्रस्तावात LAR प्रकरणांसाठी प्रारंभिक कायदेशीर विश्लेषण, Litigation Strategy Note, आर्थिक जोखीम विश्लेषण व प्रतिकूल निर्णयानंतर अपीलाबाबत तातडीने अभिप्राय देण्याची कार्यपद्धती प्रस्तावित आहे.

८. न्यायालयीन आदेश, अपील, कॅव्हेट, प्रतिज्ञापत्रे, लेखी निवेदने इत्यादींबाबत कालमर्यादित कार्यवाही सुनिश्चित करणे.

९. महानगरपालिकेच्या गोपनीय माहितीचे संरक्षण व हितसंबंध संघर्ष टाळण्यासाठी स्पष्ट नियम लागू करणे.

१०. विधीज्ञांच्या कामकाजाचे परीक्षण करण्यासाठी साप्ताहिक / मासिक अहवाल व कार्यप्रगती प्रणाली निर्माण करणे.

प्रस्तावित कार्यपद्धतीमुळे होणारे सकारात्मक परिणाम :-

प्रस्तावित नियमावली व कार्यपद्धती लागू झाल्यास महानगरपालिकेच्या न्यायालयीन कामकाजामध्ये पुढील सकारात्मक परिणाम अपेक्षित आहेत :-

अ) न्यायालयीन प्रकरणांचे प्रभावी व्यवस्थापन

प्रत्येक प्रकरणाची सुनावणी, आदेश, पुढील तारीख, आवश्यक कागदपत्रे व पुढील कार्यवाही यांचा नियमित मागोवा घेता येईल.

ब) प्रकरणांमध्ये वेळेत कार्यवाही

प्रकरण स्वीकारल्याची पुष्टी, प्राथमिक कायदेशीर अभिप्राय, सुनावणीनंतरचा अहवाल, आदेशाची माहिती, अपीलाची शिफारस व कॅव्हेट यांसाठी प्रस्तावित कालमर्यादा निश्चित करण्यात आलेल्या आहेत. उदाहरणार्थ, सुनावणीनंतर अहवाल २४ तासांत, अपीलाबाबत शिफारस ४८ तासांत व कॅव्हेट अर्जाची कार्यवाही त्याच दिवशी / जास्तीत जास्त २४ तासांत करण्याची सेवा-स्तर व्यवस्था प्रस्तावित आहे.

क) महानगरपालिकेच्या आर्थिक हिताचे संरक्षण

LAR, भरपाई, मालमत्ता, महसूल, कर व इतर आर्थिक स्वरूपाच्या प्रकरणांमध्ये संभाव्य आर्थिक दायित्वाचे परीक्षण करून योग्य कायदेशीर रणनीती निश्चित करता येईल.

ड) न्यायालयीन निष्काळजीपणा कमी होणे

न्यायालयात अनुपस्थिती, अनावश्यक तहकूब, मुदतींचे उल्लंघन, अपीलास विलंब, आवश्यक कागदपत्रे वेळेत दाखल न करणे इत्यादी बाबींवर नियंत्रण ठेवता येईल. नियमावलीमध्ये अशा बाबींना गंभीर निष्काळजीपणाच्या स्वरूपात विचारात घेण्याची तरतूद आहे.

ई) उत्तरदायित्व निश्चित होणे

प्रत्येक विधीज्ञाची कर्तव्ये, अहवाल सादरीकरण, न्यायालयीन आदेश कळविणे, विभागाशी समन्वय व कागदपत्रांची सुरक्षितता याबाबत स्पष्ट जबाबदारी निश्चित होईल.

फ) हितसंबंधांचा संघर्ष टाळणे

महानगरपालिकेविरुद्ध किंवा विरोधी पक्षकाराच्या बाजूने हितसंबंध निर्माण होणाऱ्या परिस्थितीवर नियंत्रण ठेवता येईल तसेच गोपनीय माहितीचा गैरवापर टाळता येईल.

ग) पारदर्शकता व प्रशासकीय नियंत्रण

प्रकरण वाटप, वकीलपत्र, मानधन, अहवाल व प्रकरण हस्तांतरण यासाठी निश्चित कार्यपद्धती असल्यामुळे प्रशासकीय निर्णय अधिक सुसंगत व तपासणीयोग्य होतील.

घ) डिजिटल न्यायालयीन व्यवस्थेशी सुसंगतता

ई-फायलिंग, ई-कोर्ट, ई-मेल, PDF, व्हिडिओ कॉन्फरन्सिंग व ई-ऑफिसशी समन्वय यामुळे न्यायालयीन कामकाज अधिक गतिमान होण्यास मदत होईल.

सदर विषय हा महानगरपालिकेच्या न्यायालयीन कामकाजाशी, सार्वजनिक मालमत्ता व सार्वजनिक निधीच्या संरक्षणाशी आणि महानगरपालिकेच्या कायदेशीर हिताशी थेट संबंधित आहे. त्यामुळे पॅनेलवरील विधीज्ञांच्या नियुक्तीची प्रक्रिया केवळ व्यक्तिनिहाय नियुक्तीपुरती मर्यादित न ठेवता सर्वसाधारण, एकसमान व संस्थात्मक स्वरूपाची कार्यपद्धती निश्चित करणे आवश्यक आहे.

प्रस्तावित नियमावलीमध्ये विधीज्ञांची पात्रता, अनुभव, कर्तव्ये, गोपनीयता, हितसंबंध संघर्ष, न्यायालयीन कामकाज, LAR प्रकरणांची विशेष कार्यपद्धती, सेवा-स्तर कालमर्यादा, तडजोड / समझोता, कनिष्ठ अधिवक्त्यांची नियुक्ती, अहवाल प्रणाली, मानधन, प्रकरण वाटप, प्रकरण हस्तांतरण, अपात्रता इत्यादी विविध बाबींचे नियमन करण्यात आलेले आहे.

तसेच इतर महानगरपालिकेच्या तसेच सिडको सारख्या संस्थांच्या जाहिरातीतही विविध न्यायालये / न्यायिक प्राधिकरणांसाठी न्यायालयनिहाय पॅनेल नियुक्तीची पद्धत व तीन वर्षांचा कालावधी दिसून येतो. त्यामुळे न्यायालयनिहाय पॅनेलची संकल्पना महानगरपालिकांच्या न्यायालयीन कामकाजाच्या संदर्भात व्यवहार्य असल्याचे दिसून येते.

त्यामुळे जळगाव शहर महानगरपालिकेच्या स्थानिक गरजा, न्यायालयीन प्रकरणांचे स्वरूप व महानगरपालिकेच्या हिताचे संरक्षण या बाबी विचारात घेऊन सदर नियमावली व कार्यपद्धती निश्चित करणे प्रशासकीयदृष्ट्या आवश्यक, व्यवहार्य व हितावह आहे.

पॅनेल नियुक्ती प्रक्रियेत सर्व अर्जदारांकडून समान स्वरूपाची माहिती व कागदपत्रे प्राप्त होण्यासाठी विहित अर्जाचा नमुना निश्चित करणे आवश्यक आहे.

त्याचप्रमाणे पुढील बाबींसाठी स्वतंत्र नमुने निश्चित केल्यामुळे प्रक्रिया अधिक पारदर्शक व दस्तऐवजीकरणयुक्त होईल :-

१. विधीज्ञ पॅनेल नियुक्तीसाठी अर्जाचा नमुना.
२. न्यायालयनिहाय / विषयविशेष पॅनेल निवडीसाठी माहितीपत्र.
३. हाताळलेल्या न्यायालयीन प्रकरणांचा तपशील.
४. हितसंबंध नसल्याबाबत घोषणापत्र.
५. गोपनीयता प्रतिज्ञापत्र.
६. व्यावसायिक गैरवर्तन / शिस्तभंग नसल्याबाबत घोषणापत्र.
७. नियमावलीतील अटी व शर्ती मान्य असल्याबाबत हमीपत्र / प्रतिज्ञापत्र.
८. कार्यालयीन व डिजिटल सुविधांबाबत घोषणापत्र.

९. प्रकरण स्वीकारल्याची पुष्टी / कार्यवाही अहवाल.

१०. सुनावणीनंतरचा अहवाल.

११. Litigation Strategy Note.

१२. अपीलाबाबत कायदेशीर अभिप्राय.

१३. मानधन देयकासोबत सादर करावयाच्या कागदपत्रांचा नमुना.

यामुळे सर्व पॅनेल विधीज्ञांकडून एकसमान माहिती, जबाबदारी व हमी घेणे शक्य होईल.

वरील सर्व बाबींचा विचार करता, जळगाव शहर महानगरपालिकेच्या न्यायालयीन प्रकरणांमध्ये प्रभावी, सक्षम, वेळेत व गुणवत्तापूर्ण कायदेशीर प्रतिनिधित्व उपलब्ध करून देण्यासाठी तसेच न्यायालयीन प्रकरणांचे संस्थात्मक व उत्तरदायित्वपूर्ण व्यवस्थापन करण्याच्या दृष्टीने "विधीज्ञ पॅनेल नियुक्ती, न्यायालयीन प्रकरण व्यवस्थापन, व कार्यपद्धती नियमावली, २०२६" लागू करणे आवश्यक आहे.

त्यामुळे खालीलप्रमाणे ठराव मंजूर करणेत येत आहे :-

"जळगाव शहर महानगरपालिकेच्या न्यायालयीन प्रकरणांमध्ये महानगरपालिकेची प्रभावी व सक्षम बाजू मांडण्यासाठी अनुभवी व पात्र विधीज्ञांचे न्यायालयनिहाय / विषयविशेष पॅनेल गठीत करण्याच्या अनुषंगाने तयार करण्यात आलेली 'विधीज्ञ पॅनेल नियुक्ती, न्यायालयीन प्रकरण व्यवस्थापन, व कार्यपद्धती नियमावली, २०२६' तसेच त्यासोबतचे अर्जाचे नमुने, हमीपत्रे, प्रतिज्ञापत्रे, घोषणापत्रे व संबंधित कार्यपद्धतीचे नमुने यांना मान्यता देण्यात येत आहे."

"सदर नियमावलीनुसार विधीज्ञ पॅनेल नियुक्तीची प्रक्रिया राबविण्यास, आवश्यकतेनुसार न्यायालयनिहाय / विषयविशेष पॅनेल गठीत करण्यास, प्रकरण वाटप व संबंधित प्रशासकीय कार्यवाही करण्यास तसेच नियमावलीची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक ती पुढील कार्यवाही करण्यास आयुक्त, जळगाव शहर महानगरपालिका यांना प्राधिकृत करण्यात येत आहे."

"सदर नियमावलीतील मानधन, फी व इतर आर्थिक बाबींसाठी स्वतंत्रपणे स्थायी सभेमार्फत मंजूर करण्यात येणाऱ्या दरपत्रकानुसार कार्यवाही करण्यात यावी."

वरीलप्रमाणे सद्यस्थिती, न्यायालयीन कामकाजाचे वाढते स्वरूप, महानगरपालिकेच्या सार्वजनिक निधी व मालमत्तेचे संरक्षण, न्यायालयीन प्रकरणांमध्ये वेळेत व प्रभावी कार्यवाहीची आवश्यकता, विधीज्ञांच्या कामकाजातील उत्तरदायित्व, हितसंबंध संघर्ष व गोपनीयता, तसेच न्यायालयीन प्रकरणांचे नियमित संनियंत्रण या सर्व बाबींचा विचार करता सदर कार्यपद्धती व नियमावली लागू करणे आवश्यक व प्रशासकीयदृष्ट्या उचित आहे.

त्यामुळे "विधीज्ञ पॅनेल नियुक्ती, न्यायालयीन प्रकरण व्यवस्थापन, व कार्यपद्धती नियमावली, २०२६" तसेच त्यासोबतचे अर्ज, घोषणापत्र, हमीपत्रे, प्रतिज्ञापत्रे व इतर विहित नमुने यांना उपरोक्त प्रस्तावित केलेनूसार मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप तसेच कायदेशिर अडचणी येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

सर्वानुमते मंजुर

अनुकुल मते :- ६६ प्रतिकुल मते :- ००

सुचक :- ॲड सौ.हाडा शुचिता अतुलसिंह

अनुमोदक :- श्री.घुगे-पाटील राजेंद्र झिपरु

सही /-

(दिपमाला मनोज काळे)

महापौर

जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव

प्रत कार्यवाहीस्तव

मा.आयुक्त, महानगरपालिका, जळगांव.

म.न.पा.चौबे कन्या माध्यमिक विदयालयातील श्री.सुधाकर सिताराम पाटील (उपशिक्षक) यांना एकाच पदावर सलग २४ वर्षे सेवा झालेली असल्याने त्यांना निवडश्रेणी लागु करणेबाबत मा.महासभा ठराव क्रं.२६ दि.१४/०५/२०२६ अन्वये तहकूब ठरावाबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

असा ठराव करणेंत येत आहे की, जळगाव शहर महानगरपालिका संचलित रामलालजी चौबे महानगरपालिका माध्यमिक विद्यालय येथील उपशिक्षक, श्री. सुधाकर सिताराम पाटील यांची सलग २४ वर्षे अहर्ताकारी सेवा पूर्ण झाल्यामुळे त्यांना निवडश्रेणी लागू करणे बाबत प्रशासनाकडून आलेला प्रस्ताव दि. १४/०५/२०२६ रोजीच्या महासभेमध्ये विषय क्रमांक-०२, ठराव क्रमांक २६ तांत्रिक कारणास्तव पुढील महासभेपर्यंत तहकूब करण्यात आलेला होता.

सदर प्रस्तावाची सेवा पुस्तक व शासन निर्णयाच्या आधारे पुनश्च पडताळणी करण्यात आलेली असून प्रस्ताव महासभेमध्ये विचारार्थ पुनश्च सादर करणेत आलेला आहे.

जळगांव शहर महानगरपालिका संचलित मराठी माध्यमाची माध्यमिक शाळा १००% अनुदानित असून सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे दरमहा १००% वेतन जिल्हा परिषदेमार्फत अदा केले जाते. शासन निर्णयानुसार उपशिक्षकांना "निवडश्रेणी" लागू करणेसाठी त्यांची १) एकाच पदावर सलग सेवा २४ वर्षे पूर्ण झालेली असावी. २) मागील दोन वर्षांचे गोपनीय अहवाल समाधानकारक असावे. ३) उपशिक्षकाची शैक्षणिक अर्हता अथवा व्यावसाईक अर्हता ही पदव्युत्तर असावी. ४) सदर शिक्षकाने शासनातर्फे आयोजित निवडश्रेणी प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण करणे आवश्यक आहे.

शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये वरीष्ठ वेतनश्रेणी मध्ये वेतन घेणारे खालील प्रमाणे ०५ शिक्षक कार्यरत होते.

वरिष्ठ श्रेणी - सेवा ज्येष्ठता यादी

संस्थेचे नांव व पत्ता :- माध्यमिक शिक्षण विभाग, जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव

अ.क्र.	शिक्षकांचे नांव	पदनाम	शैक्षणिक अर्हता	विदयमान वरिष्ठ श्रेणी रुपये व लागू केल्याचा दिनांक	प्रशिक्षीत सेवा २४ वर्षे पुर्ण होणारा दिनांक	देय निवड श्रेणी रु.व ती लागू दिनांक	निवड श्रेणीसाठी पात्र आहे किंवा कसे ? अपात्रता कारण	सेवा निवृत्ती दिनांक
१	२	३	४	५	६	७	८	९
१	श्री.सुधाकर सिताराम पाटील	उपशिक्षक	M.A.B.Ed.	S-१५ २५/०७/२००४ ४१८००-१३२३००	२५/०७/२०१५	०१/०७/२०२३ S-१७ ४७६००-१५११००	पात्र	३०/०४/२०२७
२	श्री.दिनकर हेमचंद्र ढाके	उपशिक्षक	B.Sc.B.Ed.	S-१५ १३/०६/२००४ ४१८००-१३२३००	१३/०६/२०१६	अपात्र	विहीत शैक्षणिक अर्हता नाही	३१/१०/२०२५
३	श्रीमती मनिषा नितीन पाटील	उपशिक्षका	B.Sc.B.Ed.	S-१५ १७/०६/२००५ ४१८००-१३२३००	१७/०६/२०१७	अपात्र	विहीत शैक्षणिक अर्हता नाही	३१/०३/२०२७
४	श्रीमती छाया सिताराम खैरनार	उपशिक्षका	M.A.B.Ed.	S-१५ १८/०४/२००६ ४१८००-१३२३००	१८/०४/२०१८	अपात्र	सेवाखंड	३०/०९/२०२४
५	उमाकांत धना भारुळे	उपशिक्षक	B.Sc.B.Ed.	S-१५ १३/०६/२००७ ४१८००-१३२३००	१३/०६/२०१९	अपात्र	विहीत शैक्षणिक अर्हता नाही	३१/१२/२०२४

उपरोक्त तक्त्यामधील एकूण ०५शिक्षक हे वरिष्ठ वेतनश्रेणीत वेतन घेत असल्यामुळे त्यापैकी सेवाज्येष्ठ शिक्षक व निवडश्रेणीसाठीची विहीत अर्हता प्राप्त असलेले शिक्षक श्री.सुधाकर सिताराम पाटील हे निवडश्रेणीसाठी पात्र आहेत.

वरील सर्व बाबींचा विचार करता जळगांव शहर महानगरपालिका संचलित चौबे कन्या माध्यमिक विदयालयातील उपशिक्षक श्री.सुधाकर सिताराम पाटील (M.A.B.Ed) यांनी एकाच पदावर सलग २४ वर्षे अर्हताकारी सेवा पूर्ण केलेली

असून मागील दोन वर्षाचे गोपनीय अहवाल समाधानकारक आहेत. शासनातर्फे निर्धारीत केलेले निवडश्रेणीकरीता आवश्यक असलेले प्रशिक्षण त्यांनी यशस्वीरित्या पुर्ण केलेले आहे. त्यांची पदव्युत्तर पदवी (M.A.) उत्तीर्ण प्रमाणपत्राची सत्यप्रत जोडलेली आहे. मागील दोन वर्षाच्या गोपनीय अहवालाच्या प्रती जोडलेल्या आहेत. तसेच विहीत प्रशिक्षण पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र जोडलेले आहे. त्यांना दि. २५/०७/२००४ रोजी वरिष्ठ वेतनश्रेणी लागू केल्याची सेवा पुस्तकातील नोंदीची झेरॉक्स जोडलेली आहे.

श्री.सुधाकर सिताराम पाटील (उपशिक्षक) हे जरी जिल्हा परिषदेमार्फत वेतन घेत असले तरी त्यांची आस्थापना महापालिकेच्या शाळेकडे आहे, त्यांची नियुक्ती, बदली, पदोन्नती, वेतनवाढ इत्यादी सर्व अधिकार हे संस्था या नात्याने महापालिकेचे आहेत, महापालिकेमध्ये शिक्षण अथवा तत्सम कोणतीही समिती अस्तित्वात नसल्यामुळे श्री.सुधाकर सिताराम पाटी [उपशिक्षक] यांना दिनांक ०१/०७/२०२३ पासून खालीलप्रमाणे निवडश्रेणी लागू करणेबाबतचा प्रस्ताव मुख्याध्यापक रामलालजी चौबे मनपा कन्या माध्यमिक विदयालय यांचेकडून महासभेच्या मंजुरीस्तव सादर करण्यात आलेला आहे.

अ. क्र.	शिक्षकांचे नांव	नियुक्ती दिनांक	शैक्षणिक अर्हता	शिक्षण विभागाची मान्यता दिनांक	१२ वर्षे वरीष्ठ वेतनश्रेणी लागू झाल्याचा दिनांक	वरिष्ठ वेतनश्रेणी लागू करण्याचा दिनांक	२४ वर्षाची निवड श्रेणीसाठी पात्र आहेत काय / होय	निवड श्रेणीची वेतन श्रेणी मुळ वेतन	निवड श्रेणीची वेतनश्रेणी मुळ वेतन
१	२	३	४	५	६	७	८	९	
१	श्री.सुधाकर सिताराम पाटील	२५/०७/१९९१	M.A.B.Ed.	२५/०७/१९९१	२५/०७/२००४	S-१५ ४१८००-१३२३०० ८२५००	०१/०७/२०२३ विकल्पानुसार	होय	S-१७ ४७६००-१५११०० ८३६००

मुख्याध्यापक चौबे मनपा कन्या माध्यमिक विदयालय यांचेकडील वरील प्रस्ताव पाहता श्री. सुधाकर सिताराम पाटील [उपशिक्षक] यांना निवडश्रेणी लागू करणेबाबतच्या प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप तसेच कायदेशिर अडचणी येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

सर्वानुमते मंजुर

अनुकुल मते :- ६६ **प्रतिकुल मते :- ००**

सुचक :- श्री.बरडे नितीन मनोहर

अनुमोदक :- श्री.सपके नितीन प्रभाकर

सही /-

(दिपमाला मनोज काळे)

महापौर

जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव

प्रत कार्यवाहीस्तव

मा.आयुक्त, महानगरपालिका, जळगांव.

केंद्र शासनाचा दूरसंचार कायदा, २०२३ व दूरसंचार नियम, २०२४ ची अंमलबजावणी बाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

असा ठराव करणेंत येत आहे की, केंद्र शासनाचा दूरसंचार कायदा, २०२३ मधील कलम १४ (३) नुसार कोणत्याही मालमत्तेवर स्थापित केलेल्या दूरसंचार नेटवर्कला (मोबाईल टॉवर/मनोरे) त्या मालमत्तेचा भाग मानले जाणार नाही, तसेच त्यावर कोणताही मालमत्ता कर, लेव्ही, सेस, शुल्क किंवा ड्युटी आकारली जाणार नाही, अशी तरतूद करण्यात आली आहे. सदर कायद्याची व नियमांची अंमलबजावणी राज्यात दिनांक ०१ जानेवारी, २०२५ पासून करण्याचे आदेश राज्य शासनाच्या नगर विकास विभागाचा शासन निर्णय क. दूपासु-२०२४/प्र.क्र.१०/नवि-२०, दि. ०५/०२/२०२५.व सामान्य प्रशासन विभागाच्या मा.उपसचिव, महाराष्ट्र शासन, नवि-२० यांचेकडील पत्र क्र. संकिर्ण-२०२१/ प्र.क्र.२४२/नवि-२०, दिनांक ३१/०१/२०२४ चे पत्रान्वये प्राप्त झाले आहेत.

या संदर्भात, जळगाव शहर महानगरपालिकेच्या कर मूल्य निर्धारण व आकारणी नोंदवहीनुसार, जळगाव मनपा क्षेत्रात एकूण ३४८ मोबाईल टॉवरची नोद आहे. शासन निर्णयानुसार या मोबाईल टॉवर्सची आर्थिक वर्ष २०२५-२६ पासूनची मालमत्ता कराची चालू मागणी निरंक करणे आवश्यक ठरले आहे. त्यानुसार जळगाव शहर महानगरपालिकेच्या स्थायी समितीने ठराव क्र. १६, दि. १३/०४/२०२६ अन्वये या प्रस्तावास व मागणी निरंक करण्यास मान्यता दिली आहे.

केंद्र शासनाच्या या धोरणात्मक निर्णयामुळे जळगाव शहर महानगरपालिकेचे मोठे आर्थिक नुकसान होत आहे. मोबाईल टॉवर कंपन्यांकडील जुनी थकीत मागणी रु.२८,०२,१७,७१९/- आणि चालू आर्थिक वर्षाची मागणी रु. २,६४,३२,७२५/- अशी एकूण रु. ३०,६६,५०,४४६/- (अंदाजे २८ कोटी रुपये) एवढी मोठी रक्कम निरंक करावी लागत आहे. सदर महसूल जळगाव मनपाच्या अंदाजपत्रकात गृहीत धरण्यात आला असल्याने, यामुळे महापालिकेच्या नागरी विकास कामांवर अत्यंत विपरीत परिणाम होणार आहे.

जळगाव शहर महानगरपालिकेच्या स्थायी समितीने घेतलेल्या निर्णयानुसार, केंद्र अथवा राज्य शासनाच्या धोरणामुळे स्थानिक स्वराज्य संस्थेचा हक्काचा महसूल बुडत असल्याने, या महसुली नुकसानीची भरपाई म्हणून राज्य शासनाकडून विशेष अनुदान मिळणे न्यायोचित ठरेल.

तरी, जळगाव शहर महानगरपालिकेच्या आर्थिक स्थितीचा व नागरी विकासाचा विचार करता, दूरसंचार कायद्याच्या अंमलबजावणीमुळे होणाऱ्या सुमारे २८ कोटी रुपयांच्या आर्थिक नुकसानीच्या भरपाईपोटी जळगाव शहर महानगरपालिकेस विशेष अनुदान मंजूर करण्यात यावे याबाबत मा.प्रधान सचिव, माहिती व तंत्रज्ञान विभाग महाराष्ट्र शासन, मंत्रालय मुंबई यांना पत्र देणेबाबत नमुद आहे. जळगाव शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील विविध कंपन्यांच्या अधिकृत व अनधिकृत मोबाईल मनोऱ्यांवर (टॉवर्स) लागू असलेली मालमत्ता कराची आकारणी केंद्र व राज्य शासनाच्या आदेशानुसार तसेच जळगाव मनपा स्थायी समिती ठराव क्र. १६ च्या मंजुरीनुसार दिनांक ०१/०१/२०२५ पासून वगळणे व सदर मोबाईल मनोऱ्यांचे करपात्र मूल्य शून्य (०) करणे आवश्यक आहे.

शासन निर्णयानुसार केवळ दि. ०१.०१.२०२५ पासूनचा पुढील कर वगळण्यात आला आहे. त्यामुळे दिनांक ३१.१२.२०२४ पावेतो ज्या मोबाईल टॉवर कंपन्यांची मालमत्ता कराची थकबाकी (अंदाजे रु. २८,०२,१७,७१९/-) प्रलंबित आहे, ती थकबाकी संबंधित कंपन्यांकडून वसूल करणे अनिवार्य आहे. परंतु मा.उपसचिव, नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन, नवि-२० यांचेकडील पत्र क्र. संकिर्ण-२०२१/ प्र.क्र.२४२/नवि-२०, दिनांक ३१/०१/२०२४ च्या पत्रान्वये नगरविकासविभाग, शासन निर्णय क्रमांक संकिर्ण-२०२१/ प्र.क्र.२०, दिनांक १//१२/२०२२ अन्वये निर्गमित केलेल्या महाराष्ट्र दुरसंचार पायाभूत सुविधा मार्गदर्शन तत्वे २०२२ मधील मुद्दा क. १९ मधील ४ नुसार कोणत्याही मोबाईल टॉवरवर दंडात्मक कारवाई करणेबाबत अंतिम अधिकार मा.प्रधान सचिव माहिती व तंत्रज्ञानविभाग, महाराष्ट्र शासन यांना आहेत. त्यामुळे मोबाईल टावरवर दंडात्मक कारवाई करण्यापुर्वी मा.प्रधान सचिव माहिती व तंत्रज्ञान विभाग यांची नगरविकास विभागामार्फत पुर्व परवानगी घेण्यात यावी व परवानगी मिळाल्यानंतरच मोबाईल टॉवरवर अंतिम कारवाई करावी असे नमुद आहे.

करीता १) सन २०२५-२६ पासुन शहरातील सर्व मोबईल टॉवरवरील मालमत्ताकराची आकारणी रद्द करणे, व नव्याने तयार झालेल्या कोणत्याही मोबाईल टॉवरवर मालमत्ताकराची आकारणी न करणे याबाबत आदेश निर्गमिती करणेस, व २) स्थायी समिती ठराव क्र. ठराव क्र. १६, दिनांक १३/०४/२०२६ अन्वये सन २०२५-२६ पासुन मोबाईल टॉवरची मालमत्ताकराची आकारणी रद्द केल्याने महानगरलिकेच्या होणाऱ्या आर्थिक नुकसानीपोटी अनुदान मिळणेसाठी शासनाकडे पत्रव्यवहार करणेस, तसेच ३) सन २०२४-२५ अखेर मोबाईल टॉवर कंपन्यांकडे मोठ्या प्रमाणावर असलेल्या मालमत्ताकराच्या थकबाकी वसुली साठी दंडात्मक कारवाई करणेसाठी मा.प्रधान सचिव माहिती व तंत्रज्ञान विभाग यांची पुर्वपरवागी मिळण्यासाठी नगरविकासविभाग महाराष्ट्र शासन यांना पत्रव्यवहार करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप तसेच कायदेशिर अडचणी येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

सर्वानुमते मंजुर

अनुकुल मते :- ६६ **प्रतिकुल मते :- ००**

सुचक :- श्री.लढ्ढा नितीन बालमुकुंद

अनुमोदक :- श्री.पाटील चंद्रशेखर शिवाजी

सही /-

(दिपमाला मनोज काळे)

महापौर

जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव

प्रत कार्यवाहीस्तव

मा.आयुक्त, महानगरपालिका, जळगांव.

उत्कर्ष ग्लोबल फाऊंडेशन, मुंबई यांचा मक्ता रद्द करुन नविन EOI प्रमाणे ई-निविदा प्रसिध्द करणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

असा ठराव करणेंत येत आहे की, जळगांव शहरातील भटकी व मोकाट कुत्री पकडुन (प्राणी क्लेश प्रतिबंधक कायदा १९६०, महाराष्ट्र संरक्षण प्राणी कायदा १९७६ आणि पाणी उत्पत्ती प्रतिबंधक कायदा २००१ नुसार) नसबंदी शस्त्रक्रिया करणे तदनंतर ॲन्टी रेबीज लसीकरण करुन उजव्या कानावर V नाँच करुन पकडलेल्या पुर्ववत ठिकाणी कुत्रे सोडणेकामी स्थायी समिती / प्रशासकिय ठराव क्र. २७८ दि.११/०७/२०२५ नुसार मान्यता प्रदान केलेली असून महानगरपालिकेस दि.२४/०७/२०२५ रोजी करुन दिलेली संविदा व कार्यादेश कं. ४०९/२०२५-२६ दि.२५/०७/२०२५ नुसार संविदा करून उत्कर्ष ग्लोबल फाऊंडेशन, मुंबई यांना रु.११९९ प्रती श्वान प्रमाणे कार्यादेश देण्यात आलेला आहे.

त्याअनुषंगाने करारनाम्यातील अटी शर्तींची पुर्तता न करणे, वारंवार पुर्व सूचना न देता काम बंद करणे, श्वान निर्बीजीकरण शस्त्रक्रिया संत गतीने करणे कामी उत्कर्ष ग्लोवल फाऊंडेशन, मुंबई यांना आरोग्य / जा.क्र. २०७/२०२६ दि.१३/०४/२०२६ रोजी अंतिम नोटीस देण्यात आलेली होती.

सदर नोटीसीच्या अनुषंगाने उत्कर्ष ग्लोबल फाऊंडेशन, मुंबई यांनी दि. १७/०४/२०२६ रोजी खुलासा सादर केलेला असून सदरचा खुलासा समाधानकार नसल्यामुळे संस्थेवर कोणतीही पुढील कार्यवाही करणेपुर्वी ई-निविदा मध्ये संस्थेसोबत केलेल्या करारनामा मधील अ) सर्व साधारण अटी व शर्ती अट नं. ४६ नुसार ८१ अभिकर्ता यांची काम करण्यास नकार दिल्यास अथवा काही तांत्रिक कारणास्तव कार्यादेश रद्द करावा लागल्यास ८२ अभिकर्ता यांनी L१ अभिकर्ता यांच्या मंजुर दरात काम करण्यास सहमती दर्शविल्यास अशा परिस्थितीत निर्णय घेण्याचा अधिकार आयुक्त यांना राहतील असे नमुद केलेले आहे.

त्याअनुषंगाने ८२ अभिकर्ता युनिवर्सल अनिमल वेल्फेअर सोसायटी बिड यांना जळगांव शहरातील दैनंदिन भटक्या व मोकाट श्वानांच्या नसबंदी शस्त्रक्रियेचे काम L१ च्या दरात करणेस ईच्छुक असल्यास दि.३०/०४/२०२६ रोजी चर्चे करिता आयुक्त यांचे दालनात उपस्थित राहणे कामी युनिवर्सल अनिमल वेल्फेअर सोसायटी बिड यांना इकडील आरोग्य जा.क्र./ २९९/२०२६-२७ दि.२०/०४/२०१६, नुसार पत्र देण्यात आलेले होते.

दि.२५/०४/२०१६ रोजीचे पत्रानुसार युनिवर्सल अनिमल वेल्फेअर सोसायटी बिड हे शहरातील दैनंदिन भटक्या व मोकाट श्वानांच्या नसबंदी शस्त्रक्रियेचे काम करणेस ईच्छुक आहे. परंतु L१ (रु.११९९ प्रती श्वान) यांचे मंजूर दराने काम करणेस संस्था तयार नसून युनिवर्सल अनिमल वेल्फेअर सोसायटी बिड यांनी ई-निविदा मध्ये सादर केलेल्या रु.१६३५/- प्रती श्वान काम करण्यास सहमती दर्शविलेली आहे. परंतु सदर संस्थेमध्ये मागणी केलेल्या वाढीव दरात काम देणे शक्य नाही.

तसेच सदर उत्कर्ष ग्लोबल फाऊंडेशन, मुंबई संस्थेने दि.०१/०८/२०२५ ते ३१/०७/२०२६ पर्यंत फक्त १८४० श्वांनावर खालील प्रमाणे निर्बीजीकरण शस्त्रक्रिया केलेली आहे.

अ.क्र.	माहे	मेल	फिमेल	एकूण
१.	ऑगस्ट २०२५	१४	१९	३३
२.	सप्टेंबर २०२५	३२	३३	६५
३.	ऑक्टोंबर २०२५	९०	६३	१५३
४.	नोव्हेंबर २०२५	९०	६३	१५३
५.	डिसेंबर २०२५	२१४	१६०	३७४
६.	जानेवारी २०२६	२३०	१७४	४०४
७.	फेब्रुवारी २०२६	१२०	६३	१८३
८.	मार्च २०२६	९८	३२	१३०
९.	एप्रिल २०२६	२४	१४	३८
१०.	मे २०२६	४३	४२	८५
११.	जुन २०२६	१३५	८७	२२२
१२.	जुलै २०२६	९१	१०१	१९२
	एकूण -	११८१	८५१	२०३२

तसेच उत्कर्ष ग्लोबल फाऊंडेशन, मुंबई संस्थेने खालील कालावधीत एकूण – १०३ दिवस काम बंद ठेवलेले होते.

अ.क्र.	दिनांक	काम बंद ठेवलेले दिवस
१.	दि.२४/११/२०२५ ते २९/११/२०२५	६
२.	दि.०८/०२/२०२६ ते १८/०२/२०२६	११

३.	दि.१६/०३/२०२६ ते ०५/०४/२०२६	२०
४.	दि.०९/०४/२०२६ ते १२/०४/२०२६	४
५.	दि.२०/०४/२०२६ ते ३०/०४/२०२६	११
६.	दि.२०/०४/२०२६ ते ०५/०५/२०२६	१६
७.	दि.०४/०५/२०२६ ते ०८/०५/२०२६	५
८.	दि.१२/०५/२०२६ ते १९/०५/२०२६	८
९.	दि.१७/०६/२०२६ ते ३०/०६/२०२६	१४
१०.	दि.१२/०७/२०२६ ते १४/०७/२०२६	३
११.	दि.१७/०७/२०२६ ते १९/०७/२०२६	३
१२.	दि.२२/०७/२०२६ ते २३/०७/२०२६	२
	एकूण -	१०३

तसेच करारनामा अटी शर्तीनुसार सदर संस्थेने Animal Birth Control Rule २०२१ नुसार Animal Birth Control / Anti Rabies Vaccination (ABC/ AR) नुसार शस्त्रक्रिया करणेसाठी मान्यता प्राप्त प्रमाणपत्र व Animal Birth Control Rules २०२३ नुसार Project Recognition प्रमाणपत्र आज पावेतो सादर केलेले नाहीत. तसेच सदर संस्थेस कामात सुधारणा करणे बाबत वारंवार पत्र, नोटीस व दि.१३/०४/२०२६ रोजी अंतिम नोटीस देवून सुध्दा आज पावेतो कामात कोणत्याही प्रकारची सुधारणा केलेली नाही.

तसेच संस्थेने जन्म नियंत्रण (ABC) नियम, २०२३ दि.१० मार्च २०२३ मा.सर्वोच्च न्यायलयाच्या Suo Moto Writ Petition ९ (Civil) no (s) ०५ of २०२५ मधील निर्देशानुसार विभागाने दिलेल्या आदेशाचे सुध्दा पालन केलेले नाही. तसेच करारनाम्यातील अटी शर्तीचे पुर्तता न करणे, म.न.पा.स कोणतीही पुर्व सूचना न देता १०३ दिवस काम बंद ठेवणे, पुर्ण क्षमतेने काम न करता संत गतीने सुरु ठेवणे, वारंवार कामात सुधारणा करणेस दिलेली संधीचे अवमान करणे इ. बाबींमुळे जळगांव शहरातील मोकाट व भटकी श्वानांच्या चावा घेण्याचा प्रमाणात वाढ झालेली असून दैनंदिन येणाऱ्या स्थानिक वृत्तपत्रातील तक्रारी तसेच सन्मा.सदस्य यांचेमार्फत प्राप्त होणाऱ्या तक्रारी पाहाता यावरुन असे दिसून येते की, संस्थेस कामाची आवश्यकता नाही.

करिता करारनाम्यातील अटी शर्तीनुसार उ) संविदा व मक्ता रद्द करणे बाबत १. निविदेतील कोणत्याही अटी व शर्तीचा भंग केल्यास मक्ता रद्द करण्याचा अधिकार आयुक्तांना राहील. २. प्रचलित नियम अधिनियमांची विसंगत कृती केल्यास मक्ता रद्द करण्यात येईल. असे नमुद करण्यात आलेले आहे. त्यामुळे उत्कर्ष ग्लोबल फाऊंडेशन, मुंबई संस्थेचा मक्ता रद्द करणे ही प्रशासनाची धारणा असून त्यास महासभेची मान्यता घेणे आवश्यक आहे.

परंतू जन्म नियंत्रण (ABC) नियम, २०२३ दि.१० मार्च २०२३ मा.सर्वोच्च न्यायलयाच्या Suo Moto Writ Petition ९ (Civil) no (s) ०५ of २०२५ मधील निर्देशानुसार अंमलबजावणी करणे भारतीय जिव जंतू कल्याण बोर्ड यांचेकडील दि.०५/०४/२०२२ रोजीच्या पत्रान्वये श्वान पकडणे व पुर्ववत सोडणे रु.२००/- प्रती श्वान व श्वान शस्त्रक्रिया निर्बीजीकरण करण्यासाठी रु.१४५०/- प्रती श्वान असे एकूण रु.१६५०/-प्रती श्वान नुसार नविन EOI प्रमाणे ई-निविदा प्रक्रिया पुर्ण होई पावेतो उत्कर्ष ग्लोबल फाऊंडेशन, मुंबई संस्थेचे काम सुरु ठेवणे आवश्यक आहे.

तरी उत्कर्ष ग्लोबल फाऊंडेशन, मुंबई संस्थेचा मक्ता रद्द करणेस व मा.सर्वोच्च न्यायलयाच्या आदेशानुसार ए.बी.सी. सेंटरसाठी EOI प्रमाणे ई-निविदा प्रसिध्द करणेस तसेच खाद्य केंद्रासाठी व निवारा शेल्टर करिता ई-निविदा प्रसिध्द करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप तसेच कायदेशिर अडचणी येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

सर्वानुमते मंजुर

अनुकुल मते :- ६६ प्रतिकुल मते :- ००

सुचक :- कु.सोनवणे प्रतिक्षा कैलास

अनुमोदक :- श्री.देशमुख अरविंद भगवान

सही /-

(दिपमाला मनोज काळे)

महापौर

जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव

प्रत कार्यवाहीस्तव

मा.आयुक्त, महानगरपालिका, जळगांव.

संस्थेच्या नियामक मंडळ निवडणुकीसाठी निर्वाचन गण गठित करण्याच्या अनुषंगाने जळगांव शहर महानगरपालिकेमधून निवडून आलेल्या तीन (३) विदयमान नगरसेवकांची नावे तसेच संबंधित ठरावाची प्रमाणित प्रत दिनांक २७ जुलै २०२६ पर्यंत पाठविण्याबाबत महासंचालक, ऑल इंडिया इन्स्टिटयूट ऑफ लोकल सेल्फ गव्हर्नमेंट यांचे आलेल्या पत्रावर विचार करुन निर्णय घेणे.

असा ठराव करणेंत येत आहे की, संस्थेच्या नियामक मंडळ निवडणुकीसाठी निर्वाचन गण गठित करण्याच्या अनुषंगाने आपल्या महानगरपालिकेमधून निवडून आलेल्या तीन (३) विद्यमान नगरसेवकांची नावे तसेच संबंधित ठरावाची प्रमाणित प्रत दिनांक १२ जून २०२६ पर्यंत पाठविण्याबाबत दिनांक०८ एप्रिल २०२६ चे ऑल इंडिया इन्स्टिटयूट ऑफ लोकल सेल्फ गव्हर्नमेंट यांचे परिपत्रकाद्वारे कळविण्यात आले होते.

परंतु, महाराष्ट्र विधानपरिषदेच्या स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघांतील निवडणुकांमुळे लागू करण्यात आलेल्या आचारसंहितेच्या कालावधीत अनेक स्थानिक स्वराज्य संस्थांना सभा आयोजित करून आवश्यक ठराव मंजूर करणे शक्य झाले नाही.

सदर बाबीचा विचार करून प्रतिनिधींची नावे, संपूर्ण पत्ते व संबंधित ठरावाची प्रमाणित प्रत प्राप्त होण्याची अंतिम मुदत दिनांक २७ जुलै २०२६ रोजी सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत वाढविण्यात आलेली आहे

त्याअनुषंगाने जळगांव शहर महानगरपालिकेत निवडून आलेल्या खालील नमूद तीन (३) विद्यमान नगरसेवकांची नावे, त्यांचे संपूर्ण पत्ते व महानगरपालिकेच्या सभेमध्ये मंजूर करण्यात आलेल्या संबंधित ठरावाची प्रमाणित प्रत महासंचालक,ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ लोकल सेल्फ गव्हर्नमेंट, एम. एन. रॉय ह्युमन डेव्हलपमेंट कॅम्पस, बांद्रा कॉलनी मेट्रो स्टेशन (ए 2 गेट) समोर, उत्तर भारतीय संघ महाविद्यालयाजवळ, बांद्रा (पूर्व), मुंबई – ४०००५१ यांचेकडेस पाठविणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

अ.क्र.	प्रभाग क्र.		सन्मा.सदस्याचे नांव	पक्ष	पत्ता
१.	६	ब	ॲड.शुचिता अतुलसिंह हाडा	भाजपा	"अनादी अनंत रेसिडेन्सी" ५वा मजला, रामदास कॉलनी, जळगांव
२.	६	ड	सुर्यवंशी रुद्रेंद उर्फ दिपक प्रभाकर	भाजपा	प्लॉ नं.६१ हाऊसिंग सोसायटी शाहुनगर जळगांव
३.	१	ब	पोकळे दिलीप बबनराव	शिवसेना	५/२ माऊली, इंद्रप्रस्थ नगर, जळगांव

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप तसेच कायदेशिर अडचणी येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

सर्वानुमते मंजुर

अनुकुल मते :- ६६ प्रतिकुल मते :- ००

सुचक :- श्री.बालाणी प्रकाश रावलमल

अनुमोदक :- श्री.लड्ढा नितीन बालमुकुंद

सही /-

(दिपमाला मनोज काळे)

महापौर

जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव

प्रत कार्यवाहीस्तव

मा.आयुक्त, महानगरपालिका, जळगांव.

मनपा समोरुन मानसिंग मार्केटकडे जाणारा रस्ता याला व.वा.जिल्हा वाचनालय मार्ग / पथ असे नांव देणेबाबत कार्याध्यक्ष, व.वा.वाचनालय,जळगांव यांनी दिलेल्या पत्रावर विचार करुन निर्णय घेणे.

असा ठराव करणेंत येत आहे की, जळगाव येथील वल्लभदास वालजी जिल्हा वाचनाल या सार्वजनिक व सर्वांसाठी खुल्या वाचनालयाची स्थापना १ जुलै, १८७७ रोजी झाली असून १ जुलै २०१६ रोजी १५० व्या वर्षात पदार्पण केले आहे. गेल्या १४९ वर्षांपासून ते सातत्याने व उत्तम रीतीने वाचकांना सेवा पुरवीत आहे. त्यासाठीची जागा तत्कालीन नगरपालिकेनेच दिली आहे व तेव्हापासून महापालिकेचे या वाचनालयाला नेहमीच सहकार्य राहिले आहे.

अनेक पिढ्यांचे वाचन-पोषण वाचनालयाने केलेले आहे. तसेच आज तंत्रज्ञानाने इतर वाचनालयात येणारे वाचक कमी झाले असले तरी या वाचनालयाने नुसते सातत्यच टिकवून ठेवले नाही तर कालानुरूप आधुनिकता सातत्याने आणली आहे. इतक्या वर्षांचा इतिहास असे सांगतो कि वाचनालयाने अनेक सांकृतिक कार्यक्रम अग्रकमाने आयोजित करून जळगावच्या सांस्कृतिक जडणघडणीत मोठाच वाटा उचलला आहे. वाचनालयाची माहिती देणारे एक छोटे प्रोफाईल आहे दिलेले आहे त्यावरून वाचनालयाची आपल्याला कल्पना येईल.

अशी सातत्याने काम करणारी संस्था ज्या ठिकाणी आहे तेथेच आपले अस्तित्व नुसते टिकवून आहे नव्हे तर सातत्याने १५० वर्षांपासून अव्याहत सेवा देणारे वाचनालय हे आपल्या शहराचे एक भूषण आणि सांकृतिक केंद्र आहे. अशी संस्था अतिशय दुर्मिळ आहे.

यानिमित्ताने वाचनालय ज्या रस्त्यावर आहे मनपा समोरून मानसिंग मार्केट कडे जाणारा रस्ता (अमर रगडाचे दुकान आहे तो रस्ता) याला व. वा. जिल्हा वाचनालय मार्ग/पथ असे नाव देणेबाबत मागणी व विनंती कार्याध्यक्ष, व.वा.वाचनालय,जळगांव यांनी केलेली असून नाव देणेबाबतचा ठराव वाचनालयाच्या कार्यकारिणी मंडळात झाला असून त्याची प्रत अर्जासह जोडलेली असून कार्याध्यक्ष, व.वा.वाचनालय,जळगांव यांनी केलेल्या मागणीनूसार मनपाचे अटी-शर्तीस बंधनकारक राहून मनपा समोरून मानसिंग मार्केट कडे जाणारा रस्ता (अमर रगडाचे दुकान आहे तो रस्ता) याला " व. वा. जिल्हा वाचनालय मार्ग/पथ " असे नाव देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप तसेच कायदेशिर अडचणी येणार नाहीत याची दक्षता घ्यावी. आणि सदरच्या रस्त्यास यापूर्वी कोणतेही नांव दिले नसल्याबाबत खात्री करुनच पूढील कार्यवाही करण्यात यावी.

सर्वानुमते मंजुर

अनुकुल मते :- ६६ प्रतिकुल मते :- ००

सुचक :- ॲड.सौ.हाडा शुचिता अतुलसिंह

अनुमोदक :- श्री.लढ्ढा नितीन बालमुकुंद

सही /-

(दिपमाला मनोज काळे)

महापौर

जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव

प्रत कार्यवाहीस्तव

मा.आयुक्त, महानगरपालिका, जळगांव.

म.न.पा.शाळा क्र.४५ ची जागा जिवन विकास सामाजिक संस्थेस देणेबाबत सन्मा.सदस्य,श्री.रुद्रेंद्र (दिपक) प्रभाकर सुर्यवंशी यांनी दिलेल्या पत्रावर विचार करुन निर्णय घेणे.

असा ठराव करणेंत येत आहे की, म.न.पा.शाळा क्र.४५ ची जागा जिवन विकास सामाजिक संस्थेस देणेबाबत सन्मा.सदस्य,श्री.रुद्रेंद्र (दिपक) प्रभाकर सुर्यवंशी यांनी दिलेल्या पत्रावर सभागृहात झालेल्या चर्चेनूसार सदरचा प्रस्ताव स्थगीत करणेत येत आहे.

सर्वानुमते स्थगीत

अनुकुल मते :- ६६ प्रतिकुल मते :- ००

सुचक :- श्री.लड्ढा नितीन बालमुकुंद

अनुमोदक :- श्री.सपके नितीन प्रभाकर

सही /-
(दिपमाला मनोज काळे)
महापौर
जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव

प्रत कार्यवाहीस्तव
मा.आयुक्त, महानगरपालिका, जळगांव.

मनपा शाळा क्रमांक ०५, पोलिस मुख्यालय या शाळेत मनपा माध्यमिक विदयालय, जिल्हा पेठ,जळगांव या शाळेच्या ३ वर्गखोली रुशील मल्टीपर्पज फाउंडेशन संचलित उडान दिव्यांग संस्थेस देणेबाबत सन्मा.सदस्य,श्री.अमित पांडुरंग काळे यांनी दिलेल्या पत्रावर विचार करुन निर्णय घेणे.

असा ठराव करणेंत येत आहे की, जळगांव शहरातील उडाण दिव्यांग संस्था ही शहरातील दिव्यांग बांधवांसाठी विविध शैक्षणिक, सामाजिक उपक्रम राबवित असते. जळगांव शहरातील मुकबधीर दिव्यांग विद्यार्थ्यांना शिक्षण देणेसाठी यापुर्वी उडाण दिव्यांग संस्थेस मनपा शाळा क्रमांक ०५. पोलिस मुख्यालय मनपा माध्यमिक विद्यालय, जिल्हा पेठ जळगाव या शाळेच्या ५ वर्गखोल्या देण्यात आलेल्या असून याच शाळेत पटसंख्येअभावी वर्ग खोल्या बंद अवस्थेत आहेत.

करीता सभागृहात झालेल्या चर्चेनूसार व सन्मा.सदस्यांनी केलेल्या सूचनेनूसार उपरोक्त मुकबधीर दिव्यांग विद्यार्थ्यांना शैक्षणिक सेवा पुरविणे कामी मनपाचे अटी-शर्तीस बंधनकारक राहून **मनपा शाळा क्रमांक ०५, पोलिस मुख्यालय या शाळेतील** बंदावस्थेत असलेले ७ वर्ग खोल्या रुशील मल्टीपर्पज फाउंडेशन संचलित उडान दिव्यांग संस्थेस यापुर्वी दिलेल्या दरानूसार देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप तसेच कायदेशिर अडचणी येणार नाहीत याची दक्षता घ्यावी. आणि शाळा क्र. ०५, पोलिस मुख्यालय या शाळेतील बंदअवस्थेत असलेल्या ७ वर्ग खोल्या यापूर्वी कोणत्याही संस्थेस दिले नसल्याबाबत खात्री करुनच पूढील कार्यवाही करण्यात यावी.

सर्वानुमते मंजुर

अनुकुल मते :- ६६ प्रतिकुल मते :- ००

सुचक :- श्री.काळे अमित पांडुरंग (बंडुदादा)

अनुमोदक :- श्री.खडके सुनिल वामनराव

सही /-
(दिपमाला मनोज काळे)
महापौर
जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव

प्रत कार्यवाहीस्तव
मा.आयुक्त, महानगरपालिका, जळगांव.

कालिंका माता मंदिराजवळ जुन्या जळगांवकडे जाणाऱ्या रोडवर (HDFC बँकेसमोर) लेवा पाटीदार प्रवेशव्दार उभारण्यास परवानगी देणेबाबत सन्मा.सदस्य,श्री.अमित पांडुरंग काळे व डॉ.श्री.मिलिंद दिगंबर पाटील, सचिव, जळगांव जिल्हा लेवा पाटीदार मंडळ,जळगांव यांनी दिलेल्या पत्रावर विचार करुन निर्णय घेणे.

असा ठराव करणेंत येत आहे की, लेवा पाटीदार बहुल समाजाला मान मिळावा, त्यांची अस्मिता राखली जावी यासाठी कालिंका माता मंदिराजवळ जुन्या जळगांवकडे जाणाऱ्या रोडवर (HDFC बँकेसमोर) "लेवा पाटीदार प्रवेशद्वार" उभारण्यासाठी परवानगी देणेबाबत सन्मा.सदस्य,श्री.अमित पांडुरंग काळे व डॉ.श्री.मिलिंद दिगंबर पाटील, सचिव, जळगांव जिल्हा लेवा पाटीदार मंडळ,जळगांव यांनी दिलेल्या पत्रानूसार रहदारीस कोणताही अडथळा निर्माण होणार नाही तसेच मनपाचे अटी-शर्तीस बंधनकारक राहून कालिंका माता मंदिराजवळ जुन्या जळगांवकडे जाणाऱ्या रोडवर (HDFC बँकेसमोर) "लेवा पाटीदार प्रवेशद्वार" स्व: निधीतून उभारणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

उपरोक्त नमूद ठिकाणी यापूर्वी कोणालाही प्रवेशव्दार उभारणेस परवानगी दिली नसल्याबाबत खात्री करुनच विभागाने पूढील वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप तसेच कायदेशिर अडचणी येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

सर्वानुमते मंजुर

अनुकुल मते :- ६६ प्रतिकुल मते :- ००

सुचक :- श्री.काळे अमित पांडुरंग (बंडुदादा)

अनुमोदक :- श्री.खडके सुनिल वामनराव

सही /-
(दिपमाला मनोज काळे)
महापौर
जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव

प्रत कार्यवाहीस्तव
मा.आयुक्त, महानगरपालिका, जळगांव.

पिंप्राळे येथील श्री विठ्ठल मंदिर यास महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागामार्फत “क” वर्ग तीर्थक्षेत्र घोषित करण्यासाठी जळगांव शहर महानगरपालिका महासभेचा ठराव करणेबाबत सन्मा.सदस्य,श्री.नरेंद्र आत्माराम पाटील यांनी दिलेल्या पत्रावर विचार करुन निर्णय घेणे.

असा ठराव करणेंत येत आहे की, जळगाव शहरातील पिंप्राळे येथे स्थित श्री विठ्ठल मंदिर हे ऐतिहासिक, धार्मिक व सांस्कृतिकदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचे प्राचीन मंदिर आहे. सदर मंदिराचा महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागामार्फत "क" वर्ग तीर्थक्षेत्र म्हणून समावेश व्हावा, यासाठी आवश्यक शासकीय कार्यवाही सुरू आहे.

या अनुषंगाने शासनाकडे प्रस्ताव सादर करण्यासाठी जळगाव शहर महानगरपालिकेचा ठराव आवश्यक असल्याने सदर विषय मंजूर करुन शासनाकडे आवश्यक शिफारस करण्याबाबत सन्मा.सदस्य,श्री.नरेंद्र आत्माराम पाटील यांनी विनंती पत्र दिले आहे.

सदर विषय हा जळगाव शहराच्या धार्मिक, सांस्कृतिक व पर्यटन विकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा असून, या निर्णयामुळे मंदिराचा सर्वांगीण विकास होण्यास तसेच भाविकांना अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध होण्यास मदत होणार असल्याने सन्मा.सदस्य,श्री.नरेंद्र आत्माराम पाटील यांनी दिलेल्या पत्रानूसार जळगाव शहरातील पिंप्राळे येथील श्री विठ्ठल मंदिर यास महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागामार्फत “क” वर्ग तीर्थक्षेत्र घोषित करणे कामी शिफारस करण्यात येत असून सदरच्या प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात येत आहे. तसेच अशाच प्रकारे जुने जळगांव मधिल श्री राम मंदिर तसेच मेहरुण मधिल श्री विठ्ठल मंदिर असे शहरातील ऐतिहासिक मंदिर सुध्दा तीर्थक्षेत्र घोषित करणे कामी शासनाकडे प्रस्ताव पाठविणेस सुध्दा मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप तसेच कायदेशिर अडचणी येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

सर्वानुमते मंजुर

अनुकुल मते :- ६६ प्रतिकुल मते :- ००

सुचक :- श्री.पाटील नरेंद्र आत्माराम

अनुमोदक :- सौ.बारी माधुरी अतुल

सही /-

(दिपमाला मनोज काळे)

महापौर

जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव

प्रत कार्यवाहीस्तव

मा.आयुक्त, महानगरपालिका, जळगांव.

जळगांव शहर मनपातील प्रभाग समिती कार्यालये कुशल –अकुशल मनुष्यबळ, साधन सामुग्री, यंत्रणांसह जास्तीत जास्त सेवा पुरविण्यासाठी सक्षम करणेबाबत सन्मा.सदस्य,डॉ.श्री.राधेश्याम धर्मराज चौधरी यांनी दिलेल्या पत्रावर विचार करुन निर्णय घेणे.

असा ठराव करणेंत येत आहे की, जळगाव शहर मनपा अंतर्गत चार प्रभाग समिती असून शहराच्या वेगवेगळ्या भागात तीन प्रभाग समिती कार्यालये तर एक मनपा मुख्य इमारतीत आहेत. महाराष्ट्र मनपा अधिनियम २९ अंतर्गत साडेचार लाख ते बारा लाख लोकसंख्येला किमान चार व कमाल नऊ प्रभाग समिती असू शकतात. अधिनियम २९/७ च्या अन्वये प्रभाग समितीची कामे निर्देशित केलेली आहेत. त्या अन्वये पाणीपुरवठा, जलनिःसारण, मल निःसारण, स्वच्छता, पावसाच्या तुंबलेल्या पाण्याची विल्हेवाट यासारख्या स्थानिक व अत्यावश्यक सेवांच्या संबंधातील नागरिकांची सर्वसाधारण गाऱ्हाणी त्वरेने दूर करणे तसेच वादळी पावसाच्या पाण्याचे व्यवस्थापन स्वच्छता विषयी बांधकामे आणि विकास योजना या संदर्भात शिफारशी करणे व त्याचा नियत कालांतराने आढावा घेणे अपेक्षित आहे. प्रभागातील उपवनांच्या देखभालीची सुनिश्चिती करणे हे देखील प्रभाग समितीच्या निहित कामामध्ये येते. एकंदरीत प्रभाग समिती ही त्या त्या प्रभागातील भौगोलिक भागातील नागरिकांना मनपाशी संबंधित सर्व सुविधा व सेवा देण्याचे एक मिनी मनपा केंद्र (कार्यालय) असावे असे अभिप्रेत आहे

जळगाव शहर मनपातील प्रभाग समिती यांचे अवलोकन केले असता तेथे पुरेसे कुशल व कुशल मनुष्यबळ, साधनसामुग्री व सेवा देण्यासाठी आवश्यक सक्षम अशी यंत्रणा पुरेशी व प्रभावी नसल्याचे निदर्शनास येते. त्यामुळे नागरिकांना शहराच्या दूरवरच्या भागातून थेट मनपाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये यावे लागते. मनपा क्षेत्रातील बहुताश नागरिक हे कामकाजाच्या वेळांमध्ये स्वतः उदरनिर्वाहाच्या निमित्ताने कोणत्या कोणत्या शासकीय किवा अशासकीय खाजगी आस्थापनामध्ये काम करत असतात म्हणून विविध समस्या उद्भवल्या असता त्यांच्या वेळेचा मोठा अपव्य होतो व दिलेल्या तक्रारींबद्दल / सेवांबद्दल पूर्ततेसाठी त्याना वारंवार पाठपुरावा करणे कठीण जाते. म्हणून आपणास विनंतीपूर्वक निवेदन करतो की,

१)जळगाव शहरातील प्रभाग समिती नागरिकांच्या सेवांच्या विकेंद्रीकरणाच्या दृष्टीने प्रभाग समिती संख्या वाढवता येतील का ? याचा गांभीर्याने विचार करावा. तसेच २) विद्यमान प्रभाग समिती कार्यालयांना मनुष्यबळ साधनसामग्री व प्रभावी यंत्रणा देऊन सक्षम करण्यासाठी तातडीने उपाययोजना करावी व सहा लाख जळगावकरांना त्यांच्या हक्काच्या नागरी सुविधा मिळण्यासाठी तसेच त्याबद्दलच्या तक्रारीचे निवारण करण्यासाठी दिलासा देणारे निर्णय घेणेकामी सन्मा.सदस्य यांनी प्रस्ताव दिलेला आहे.

सभागृहात उपरोक्त प्रस्तावावर झालेल्या चर्चेनूसार व सन्मा.सदस्यांनी केलेल्या सूचनेनूसार जळगाव शहरातील नागरिकांना अधिक सेवासुविधा मिळणेकरीता प्रभाग समितीचे विकेंद्रीकरण करुन प्रभाग समिती संख्या वाढवणेस तसेच विद्यमान प्रभाग समिती कार्यालयांना मनुष्यबळ साधनसामग्री व प्रभावी यंत्रणा देऊन सक्षम करण्यासाठी तातडीने उपाययोजना करणे कामी प्रस्ताव तयार करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप तसेच कायदेशिर अडचणी येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

सर्वानुमते मंजुर

अनुकुल मते :- ६६ प्रतिकुल मते :- ००

सुचक :- श्री.चौधरी राधेश्याम धर्मराज

अनुमोदक :- श्री.काळे अमित पांडुरंग (बंडुदादा)

सही /-

(दिपमाला मनोज काळे)

महापौर

जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव

प्रत कार्यवाहीस्तव

मा.आयुक्त, महानगरपालिका, जळगांव.

ऑल इंडिया इन्स्टिटयूट ऑफ लोकल सेल्फ गव्हर्नमेंट या संस्थेस Solid Waste Management २०२६ चे प्रभावी अंमलबजावणीसाठी Skill Development and Capacity Building Partner म्हणुन नियुक्ती देणेबाबत सन्मा.सदस्या,ॲड.श्रीमती, शुचिता अतुलसिंह हाडा यांनी दिलेल्या पत्रावर विचार करुन निर्णय घेणे.

असा ठराव करणेंत येत आहे की, सभागृहात झालेल्या चर्चेनूसार व सन्मा.सदस्यांनी केलेल्या सूचनेनूसार ऑल इंडिया इन्स्टिटयूट ऑफ लोकल सेल्फ गव्हर्नमेंट या संस्थेस Solid Waste Management २०२६ चे प्रभावी अंमलबजावणीसाठी Skill Development and Capacity Building Partner म्हणुन नियुक्ती देणेबाबत सन्मा.सदस्या,ॲड.श्रीमती, शुचिता अतुलसिंह हाडा यांनी दिलेला प्रस्ताव स्थगीत करण्यात येत असून हा अशासकीय प्रस्ताव असल्याने Solid Waste Management २०२६ चे प्रभावी अंमलबजावणीसाठी Skill Development and Capacity Building Partner म्हणुन नियुक्ती देणेकामी प्रशासनाने योग्य तो प्रशासकीय प्रस्ताव तयार करुन पूढील सभेत सादर करावा.

बहुमताने स्थगीत

अनुकुल मते :- ४९ प्रतिकुल मते :- १७

सुचक :- श्री.लढ्ढा नितीन बालमुकुंद

अनुमोदक :- श्री.सपके नितीन प्रभाकर

सही /-
(दिपमाला मनोज काळे)
महापौर
जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव

प्रत कार्यवाहीस्तव
मा.आयुक्त, महानगरपालिका, जळगांव.

स्वच्छ भारत मिशन (अर्बन) २.० अंतर्गत IEC (Information, Education, Communication) चे काम सुरु करणेबाबत सन्मा.सदस्या,ॲड.श्रीमती, शुचिता अतुलसिंह हाडा यांनी दिलेल्या पत्रावर विचार करुन निर्णय घेणे.

असा ठराव करणेंत येत आहे की, स्वच्छ भारत मिशन २.० नुसार प्रत्येक शहराला कचरामुक्त करण्याचे ध्येय ठेवण्यात आलेले आहे. या मिशनला बळ देण्यासाठीच SWM रुल्स २०२६ लागू करण्यात आलेला आहे. या रूल्सनुसार संपूर्ण कचरा व्यवस्थापन प्रक्रियेत सुधारणा होणे अपेक्षित आहे. कचरा विलगीकरण, कचरा संकलन, कचऱ्याची वाहतूक, कचऱ्याची संपूर्ण विल्हेवाट या सर्वच टप्प्यांमध्ये सुधारणा करण्याची जबाबदारी महानगरपालिका आणि लोकप्रतिनिधी यांच्यावर टाकण्यात आलेली आहे.

SWM RULES २०२६ चे प्रभावी अंमलबजावणीसाठी नागरिकांची सहभागीता अत्यावश्यक आहे. त्यासाठी IEC (INFORMATION, EDUCATION, COMMUNICATION) ची जबाबदारी घेणे आणि त्यासाठीचे काम जळगांव महानगरपालिकेत सुरू करणे अत्यावश्यक असल्याने स्वच्छ भारत मिशन (अर्बन) २.० अंतर्गत IEC (Information, Education, Communication) चे काम सुरु करणेस सन्मा.सदस्या,ॲड.श्रीमती, शुचिता अतुलसिंह हाडा यांनी दिलेल्या पत्रानूसार मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

IEC चे काम महानगरपालिका जळगाव येथे तात्काळ सुरू करणे कमी पुढील आवश्यक ती प्रशासकीय कारवाईची पूर्तता प्रशासनाने तात्काळ करावी.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप तसेच कायदेशिर अडचणी येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

सर्वानुमते मंजुर

अनुकुल मते :- ६६ प्रतिकुल मते :- ००

सुचक :- ॲड सौ.हाडा शुचिता अतुलसिंह

अनुमोदक :- श्री.काळे अमित पांडुरंग (बंडुदादा)

सही /-
(दिपमाला मनोज काळे)
महापौर
जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव

प्रत कार्यवाहीस्तव
मा.आयुक्त, महानगरपालिका, जळगांव.

मंजुर विकास योजना जळगांव (वा.ह) अंतर्गत पिंप्राळा गट क्र.१०९/२ या जागेतुन प्रस्तावित ३०.०० मी. रुंद विकास योजना रस्त्या बाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

असा ठराव करणेंत येत आहे की, मंजुर विकास योजना (वा.ह) अंतर्गत पिंप्राळा गट क्र. १०९/२ या जागेतुन ३०.०० मी. रुंद विकास योजना रस्ता प्रस्तावित आहे. उक्त आरक्षित जागेच्या संपादना करीता जागा मालक यांनी दि.२७/०८/२०१२ रोजी म.प्रा व न.र अधिनियम १९६६ चे कलम १२७ अन्वये खरेदी सुचना बजाविलेली आहे. उक्त खरेदी सुचना प्राप्त झाल्यानंतर या कार्यालयाकडून दि.१५/०९/२०१२ चे पत्रान्वये पोट हिस्सा दर्शविणारा मोजणी नकाशा ची पुर्तता करणे बाबत व रस्त्याच्या जागेच्या संपदनाच्या मोबदल्यात टी.डि.आर देण्यास तयार आहेत. या प्रमाणे कळविण्यात आलेले होते. तथापि, जागा मालक यांनी दि.०४/०८/२०२२ च्या पत्रान्वये टी.डी.आर घेण्यास नकार दिलेला आहे व भुसंपादन करणे बाबत कळविलेले आहे.

त्या अनुषंगाने महापालिका ठराव क्र. १४४२, दि. २३/११/२०१२ अन्वये रस्त्या खालील एकुण क्षेत्र २४४४.०० चौ.मी यास संपादन करणे व येणारा एकुण खर्च रु.१,०४,०७,००५/- यास मान्यता दिलेली आहे. व त्या नंतर महापालिकेकडील पत्र दि.२४/१२/२०१२ च्या पत्रान्वये भुसंपादन अधिनियम १८९४ नुसार भुसंपादन प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. तदनंतर नविन भूसंपादन कायदा भुसंपादनातील योग्य नुकसान भरपाई मिळण्याचा आणि भुमि संपादन पुनर्वसन व पुनर्वसाहत यामध्ये पारदर्शकता राखण्याचा हक्क अधिनियम, २०१३ मधील तरतुदी नुसार या कार्यालयाकडील पत्र क्र.५६७, दि.१९/०६/२०१४ अन्वये सुधारीत भुसंपादन प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. या सुधारीत भुसंपादन प्रस्तावात गट क्र.१०९/१ मधील ५१३.०० चौ.मी व गट क्र.१०९/२ मधील १८३१.०१ चौ.मी असे एकुण २३४४.०१ चौ.मी क्षेत्राकरीता भुसंपादन प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. प्रस्तुत प्रस्तावात उप अधिक्षक भुमी अभिलेख यांनी कळविल्यानुसार मोजणी फी रु.४५००/- धनादेश क्र.९७५८, दि.१७/०२/२०१६ अन्वये जमा करण्यात आलेली आहे. व त्या अनुषंगाने दि.२३/०५/२०१६ रोजी संयुक्त मोजणी करण्यात आलेली आहे.

तद्नंतर जागा मालक यांनी, भुसंपादन प्रस्ताव संथ गतीने सुरु असल्याबाबत व त्वरीत करणे बाबत दि.०६/०७/२०१७ स्मरण पत्र दिले. तद्नंतर लगेचच मे.उच्च न्यायालय मुंबई खंडपिठ औरंगाबाद येथे रिटपिटीशन क्र.८१५९/२०१७ दाखल केलेली आहे. या याचिकेत जागा मालक यांनी प्रस्तुत सादर केलेल्या भुसंपादनाची कार्यावाही शिघ्रगतीने व त्वरीत पुर्ण करण्यात यावी या आशयाचे निर्देश प्रतिवादी यांना देण्यात यावे. या प्रमाणे याचना केलेली आहे. प्रस्तुत रिटपिटीशन दि.१८/०७/२०१७ रोजी प्राप्त झालेली आहे. मे.उच्च न्यायालयात रिटपिटीशन दाखल झाल्यानंतर महापालिकेमार्फत विधीज्ञ यांची नियुक्ती झालेली दिसुन येत नाही. तसेच याचिकेच्या कामकाजात महापालिकेमार्फत कोणीही हजर झालेले दिसुन येत नाही. तसेच महापालिके मार्फत अद्यापपर्यंत म्हणणे सादर करण्यात आलेले नाही. तद्नंतर भुसंपादन अधिकारी यांनी दि.३१/०८/२०१७ चे पत्रान्वये संयुक्त मोजणी पडताळणी अहवाल त्वरीत सादर करणे बाबत कळविलेले आहे. तसेच दि.०२/०७/२०१८ च्या पत्रान्वये उपरोक्त प्रस्तावात ५० टक्के आगाऊ मोबदला रक्कम रु.१,०४,८०,४००/- भरणे बाबत कळविलेले आहे. त्याच प्रमाणे भुसंपादन अधिकारी यांचेकडील दि.३१/०८/२०१७ च्या पत्रान्वये अपेक्षिलेला पुनर्पडताळणी अहवाल या कार्यालयाकडून दि.२३/१२/२०१७ रोजी सादर करण्यात आलेला आहे. तसेच पुन्हा दि.०६/०८/२०१८ च्या पत्रान्वये ५० टक्के रक्कम भरणे बाबत स्मरण पत्र दिलेले आहे.

भूसंपादन अधिकारी यांच्या उपरोक्त पत्राच्या अनुषंगाने या कार्यालयाकडून दि.३१/०८/२०१८ च्या पत्रान्वये मुल्यांकन दरात २० टक्के कपात व जमिनीचे क्षेत्रात ३० टक्के कपात करुन मुल्यांकन करणे आवश्यक असले बाबत कळविण्यात येऊन त्या अनुषंगाने येणा-या रक्कमेची आकडेमोड करुन येणारी ५० टक्के रक्कमे बाबत सुधारीत प्रस्ताव महापालिकेस पाठविणे बाबत या कार्यालयाकडून विनंती करण्यात आलेली आहे. त्या अनुषंगाने भूसंपादन अधिकारी यांनी त्यांचेकडील दि. १८/०९/२०१८ चे पत्रान्वये उपरोक्त प्रमाणे आकडेमोड करुन सुधारीत ५० टक्के आगाऊ मोबदल्याची रक्कम रु.६४.५६,०३२/- भरणे बाबत कळविलेले आहे.

तद्नंतर महासभा ठराव क्र.५५, दि.०७/१२/२०१८ अन्वये ठराव पारीत करण्यात येऊन या ठरावाच्या अनुषंगाने महापालिकेच्या आर्थिक परिस्थितीचा विचार करता यापुर्वी उक्त जागेच्या भुसंपादना बाबत झालेला ठराव रद्द करण्यात यावा व जागा मालक यांना टी. डी. आर देणेस मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. या अनुषंगाने जागा मालक वैशाली अतुल मुंदडा यांना आरक्षित रस्त्याखालील क्षेत्राच्या मोबदल्यात महापालिका टी. डी. आर देण्यास तयार असले बाबत व तसा प्रस्ताव सादर करणे बाबत दि.१४/०२/२०१९ च्या पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे. त्यावर जागा मालक यांनी दि.१४/०२/२०१९ रोजी टी.डी.आर घेण्यास नकार देऊन, उक्त भुसंपादन प्रस्ताव क्र.५/२०१५ मध्ये ५० टक्के आगाऊ रक्कम त्वरीत जमा करावी या प्रमाणे विनंती केलेली आहे.

उक्त संपादना खालील गट क्र. १०९ मधील रस्त्याखालील जमिन ताब्यात न घेतल्यास ३०.०० मी. रुंद रस्ता पुर्णपणे विकसीत होऊ शकणार नाही. त्यामुळे रस्त्याचे भुसंपादन करणे आवश्यक आहे. व जळगाव म.न.पा.ने ठराव क्र.५५, दि.०७/१२/२०१८ अन्वये भुसंपादन मोबदला अदा न करण्याचा ठराव पारीत केलेला आहे. या मुळे भुसंपादनाची पुढील

कार्यवाही करता आलेली नाही. त्यामुळे महासभेने पारीत केलेला ठराव क्र.५५, दि.०७/१२/२०१८ हा लोकहिता विरुध्द असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५१ मधील तरतुदी नुसार विखंडणा करीता प्रस्ताव शासनास, महापालिकेकडील दि.०४/०६/२०१९ चे पत्रान्वये सादर करण्यात आलेला होता. व शासनाने दि.१७/०५/२०२३ च्या शासन निर्णयानुसार उपरोक्त ठराव अंतिमतः विखंडीत केला आहे. तद्नंतर उपरोक्त भुसंपादन प्रस्तावातील ५० टक्के मोबदला

रक्कम रु.६४,५६,०३२/- भरणे बाबत दि.१६/०६/२०२३ रोजी बील तयार करण्यात येऊन अर्थ विभागात सादर करण्यात आलेले आहे. मात्र तद्नंतर प्रस्तुत भुसंपादना बाबत तत्कालीन नगरसेवकांनी महापालिकेच्या हिताचा विचार करुन पुर्नप्रस्ताव सादर करणे बाबत व कोणताही मोबदला अदा करण्यात येऊ नये या स्वरुपाच्या तक्रारी केल्यामुळे या कार्यालयाकडील पत्र दि.३०/०७/२०२३ च्या पत्रान्वये अर्थ विभागास मोबदला अदा न करणे बाबत कळविण्यात आलेले आहे. व तद्नंतर भुसंपादन अधिकारी यांचेकडील दि.१६/०८/२०२४, दि.२५/१०/२०२४, दि.१०/१२/२०२४, अन्वये स्मरण पत्र प्राप्त झालेले आहे. मात्र अद्याप पर्यंत उक्त भुसंपादनाचा ५० टक्के मोबदला रक्कम अद्याप पर्यंत भुसंपादन अधिकारी यांना अदा करण्यात आलेली नाही.

प्रस्तुत प्रकरणात जागा मालक यांनी रिट याचिका क्र.८१५९/२०१७ दाखल केलेली होती. प्रस्तुत याचिकेत मे. उच्च न्यायालयाने, दि.०५/०२/२०२६ रोजी खलील प्रमाणे निकाल दिलेला आहे.

"The Hon'ble High Court may be pleased to issue appropriate writ, order or direction in the nature of writ and thereby direct the Respondents to complete the land acquisition proceedings expeditiously for acquisition of Gat No. १०९/२ and part of १०९/१ situated at Pimprala, District Jalgaon for the purpose of ३० Meters wide North-South D.P. Road." सदर निकालानुसार सदर जागेचे भुसंपादनाची प्रक्रिया जलदगतीने पुर्ण करणे बाबत उक्त निकालात नमुद आहे.

त्या अनुषंगाने सदर जागेची भुसंपादन प्रक्रीया राबविणे आवश्यक आहे. उक्त प्रकरणी यापुर्वीच तत्कालीन महापालिका ठराव क्र.१४४२, दि.२३/११/२०१२ अन्वये रस्त्या खालील एकुण क्षेत्र २४४४.०० चौ.मी यास संपादन करणे व येणारा एकुण खर्च रु.१,०४,०७,००५/- यास मान्यता दिलेली आहे. व त्या नंतर महापालिकेकडील पत्र दि. २४/१२/२०१२ च्या पत्रान्वये भुसंपादन अधिनियम १८९४ नुसार भुसंपादन प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. तदनंतर नविन भूसंपादन कायदा भुसंपादनातील योग्य नुकसान भरपाई मिळण्याचा आणि भुमि संपादन पुनर्वसन व पुनर्वसाहत यामध्ये पारदर्शकता राखण्याचा हक्क अधिनियम, २०१३ मधील तरतुदी नुसार या कार्यालयाकडील पत्र क्र.५६७, दि.१९/०६/२०१४ अन्वये सुधारीत भुसंपादन प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. या सुधारीत भुसंपादन प्रस्तावात गट क्र.१०९/१ मधील ५१३.०० चौ.मी व गट क्र.१०९/२ मधील १८३१.०१ चौ.मी असे एकुण २३४४.०१ चौ.मी क्षेत्राकरीता भुसंपादन प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. प्रस्तुत प्रस्तावात उप अधिक्षक भुमी अभिलेख यांनी कळविल्यानुसार मोजणी फी रु.४५००/- धनादेश क्र.९७५८, दि.१७/०२/२०१६ अन्वये जमा करण्यात आलेली आहे. व त्या अनुषंगाने दि. २३/०५/२०१६ रोजी संयुक्त मोजणी करण्यात आलेली आहे.

सबब भूसंपादन प्रस्ताव एसआर क्र.०५/२०१५ रद्द करण्याची विनंती उपविभागिय अधिकारी जळगाव भाग जळगाव यांनी केलेली आहे;

त्याअर्थी, भुसंपादन अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी जळगांव भाग जळगांव यांचे दि.०२/०३/२०२६ च्या प्राप्त पत्रात नमूद विनंतीच्या अनुषंगाने, संपादन संस्था यांनी नव्याने भूसंपादन प्रस्ताव सादर करावा." या प्रमाणे कळविलेले आहे.

उक्त प्रकरणी, सभागृहात झालेल्या चर्चेनूसार याप्रमाणे निर्णय घेण्यात येतो की, भुसंपादन प्रस्ताव मुळातच रद्द झालेला आहे तसेच महानगरपालिकेची आर्थिक स्थिती पाहता पिंप्राळा शिवार गट क्र.१०९/१ व गट क्र.१०९/२ यामधून जाणाऱ्या ३०.०० मी. रुंद विकास योजना रस्त्याखालील क्षेत्र संपादन करणे शक्य नाही तरी प्रशासनातर्फे सादर करण्यात आलेला भूसंपादन प्रस्ताव नामंजूर करण्यात येत आहे. तसेच प्रशासनाने वरील प्रमाणे आरक्षीत जागा आरक्षण मुक्त करणेबाबत शासनाकडेस प्रस्ताव सादर करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप तसेच कायदेशिर अडचणी येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

सर्वानुमते मंजुर

अनुकुल मते :- ६६ प्रतिकुल मते :- ००
सुचक :- श्री.लढ्ढा नितीन बालमुकुंद
अनुमोदक :- श्री.बालाणी प्रकाश रावलमल

सही /-
(दिपमाला मनोज काळे)
महापौर
जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव

प्रत कार्यवाहीस्तव
मा.आयुक्त, महानगरपालिका, जळगांव.

मंजुर विकास योजना जळगांव (वा.ह) मध्ये ३०.०० मी. रुंद विकास योजना रस्त्याखाली आरक्षित मौजे मेहरुण स.नं.१६९/१अ/१ क्षेत्र १८००.०० चौ.मी. या जमिनी बाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

असा ठराव करणेंत येत आहे की, जळगाव शहराच्या मंजूर विकास योजनेस शासनाने दि.११/०२/२००२ अन्वये मंजुरी दिलेली असून दि.०७/०४/२००२ पासून अंमलात आलेली आहे. या मंजुर विकास योजनेत ३०.०० मी. रुंद विकास योजना रस्त्याखाली मौजे मेहरुण स.नं.१६९/१अ/१ क्षेत्र १८००,०० चौ.मी ही जमिन बाधीत आहे.

उक्त विकास योजना मंजुर होणे पूर्वी व शासनाकडे सादर करण्यात आलेली असतांना सन २००० मध्ये उक्त जमिनीत रस्त्याच्या जागेचे फक्त सपाटीकरण करण्यात आले होते. मात्र प्रत्यक्षात जागा ताब्यात घेण्यात आलेली नाही. व आजतागायत सुध्दा सदरची जागा मुळ मालकांचे नावावर आहे. त्या अनुषंगाने जागा मालक यांनी त्यांची जमिन महापालिकेने ताब्यात घेतली असे दर्शवून दि.१०/०२/२००१ रोजी शासनास म. प्रा व न. र अधिनियम १९६६ चे कलम ४९ अन्वयेची सुचना बजाविलेली होती. व सदरची खरेदी सुचना शासनाने दि.०३/०८/२००१ रोजी फेटाळली आहे. तदनंतर जागा मालक यांनी रिट पिटीशन ७७७७/२००२ व रिटपिटीशन क्र.१५७५/२००२ दाखल केली होती व यात भूसंपादनाची कार्यवाही सुरु करण्या बाबतचे निर्देश देण्याची मागणी केली होती. परंतु उक्त रिटपिटीशन निकाली काढण्यात आलेले आहे. तद्नंतर जागा मालक यांनी रिटी पिटीशन क्र.५९५/२००४ दाखल केले होते व सदरचे रिटपिटीशन विड्रो करुन घेतल्याचे दिसुन येते.

तद्नंतर जागा मालक यांनी दि. २८/०१/२०१३ रोजी महापालिकेस म. प्रा व न. र अधिनियम १९६६ चे कलम १२७ अन्वयेची सुचना बजाविलेली आहे. उक्त खरेदी सुचनेच्या अनुषंगाने दि.१३/०२/२०१३ च्या पत्रान्वये उक्त जागेच्या मोबदल्यात टी.डी. आर देऊ केला होता. परंतु जागा मालक यांनी टी.डी. आर घेण्यास नकार दिलेला आहे. या कारणास्तव म.न.पा ठराव क्र.१५३६, दि. २२/०४/२०१३ पारीत करण्यात येऊन भुसंपादनाच्या प्रस्तावास मान्यता देण्यात आलेली होती. व म.न.पा पत्र क्र.६०७, दि.२३/०६/२०१४ अन्वये भुसंपादन प्रस्ताव जिल्हाधिकारी यांचेकडे सादर करण्यात आलेला आहे. तद्नंतरच्या काळात जागेच्या भुसंपादना बाबत विहीत मुदतीत कार्यवाही न झाल्याने जागा मालक यांनी मे.उच्च न्यायालयात रिटीपिटीशन क्र.५८७६/२०१५ दाखल केली आहे. व रिटपिटीशन मध्ये सदरची जागा आरक्षण मुक्त करणे बाबत मागणी केली आहे. या रिटीपिटीशन मध्ये मे. उच्च न्यायालयाने दि. ११/०८/२०१६ रोजी दिलेल्या निकालात,

- जळगाव शहर महानगरपालिकेने ३ महिन्याच्या आत भुसंपादन प्रस्ताव सादर करावा.
- भूसंपादन अधिकारी यांनी लवकरात लवकर भुसंपादनाची कार्यवाही ३ महिन्याच्या आत पुर्ण करावी.
- महापालिकेने भुसंपादन प्रस्तावात आवश्यक ती पुर्तता त्वरीत करावी. या प्रमाणे निर्देश देण्यात आलेले आहे.

तथापि उक्त जागेची त्यावेळेस आवश्यकता नसल्याने व सदर जागेच्या मोजणी नकाशात वहिवाटीचा रस्ता असे नमुद असल्याने महापालिके मार्फत उक्त W.P.No.५८७६/२०१५ यात C.A. No. १८५७५/२०१८ व रिव्हु अप्लिकेशन नं. RAST No. १८५७४/२०१८ दाखल करण्यात आलेले आहे व सद्यस्थितीत प्रलंबीत आहे.

भुसंपादन प्रस्तावात जळगाव शहर महानगरपालिके मार्फत संयुक्त मोजणी फी भरण्यात येऊन दि. ३१/०३/२०१७ रोजी संयुक्त मोजणी पुर्ण करण्यात आलेली आहे. तदनंतर भुसंपादन विभागामार्फत प्रस्तावात ५० टक्के आगाऊ मोबदला रक्कम रु.१,०३,६८,०००/- भरणे बाबत महापालिकेस दि.१७/०७/२०१७. दि.०८/०३/२०१८, १९/०४/२०२१. ०७/०५/२०२१, ०८/०५/२०२२ अन्वये कळविलेले आहे. तथापि महापालिकेमार्फत उक्त आगाऊ रक्कम भरण्यात आलेली दिसुन येत नाही. व सदरचा भुसंपादन प्रस्ताव जिल्हाधिकारी यांचे मार्फत दि.२७/०५/२०२५ रोजीच्या पत्रान्वये रद्द केलेला आहे. व भूसंपादनाची आवश्यकता असल्यास नव्याने भुसंपादन प्रस्ताव सादर करावा या प्रमाणे कळविलेले आहे.

दरम्यानच्या काळात जागा मालक यांनी उक्त रिटपिटीशन क्र.५८७६/२०१५ या दि.११/०८/२०१६ च्या निर्णयानुसार कार्यवाही मुदतीच्या आत केली नाही म्हणून मे. उच्च न्यायालयात अवमान याचिका क्र. ३१२/२०१८ दाखल केलेली आहे. या याचिकेत न्यायालयाच्या आदेशाचा अवमान केला म्हणून प्रतिवादी क्र. ०३ म्हणून सहायक संचालक, नगररचना, (शाखा कार्यालय) व प्रतिवादी क्र.०४ आयुक्त जळगाव शहर महानगरपालिका यांना शिक्षा करण्यात यावी अशी मागणी केली आहे. आणि या अवमान याचिकेत दि.०२/०५/२०१८, दि.०३/१०/२०२५, २३/०६/२०२६ व दि.०७/०७/२०२६ रोजी सुनावण्या ठेवण्यात आल्या होत्या व पुढील सुनावणी दि. २८/०७/२०२६ रोजी ठेवण्यात आली आहे.

प्रस्तुत प्रकरणात महापालिकेमार्फत न्यायालयाचे निर्देशानुसार भुसंपादनाची कार्यवाही पूर्ण न झाल्याने मे. उच्च न्यायालयाच्या दि.११/०८/२०१६ च्या निर्णयाचा अवमान झाल्याचे गृहीत धरण्यात येऊन महापालिके विरोधात विपरीत निर्णय होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या बाबत मे. उच्च न्यायालयातील विधीज्ञ यांचेशी चर्चा केली असता त्यांनी त्वरीत कार्यवाही करीता पर्याय सुचविलेले आहेत. पर्यात व त्या बाबतची आवश्यक कार्यवाही याबाबत खालील प्रमाणे सादर केली आहे.

पर्याय	कार्यवाही करणे आवश्यक
त्वरीत भूसंपादनाची कार्यवाही पुन्हा सुरु	भूसंपादन अधिकारी यांना पुन्हा प्रस्ताव सादर करावा लागेल व यात

करणे,	त्वरीत रक्कम भरुन तसेच मे. उच्च न्यायालयात सादर करावे लागेल.
जागा मालकास खाजगी वाटाघाटीने आर.सी.सी देऊन जागा संपादन करणे करीता आमंत्रीत करणे	जागा मालकास जागेच्या संपादना करीता आमंत्रीत करणे व जागा मालक आर.सी.सी. च्या मोबदल्यात जागा देण्यास तयार असल्यास तसे बंधपत्र घेऊन मे. उच्च न्यायालयात सादर करावे लागेल.
विकास योजना रस्त्याखालील जागा आरक्षण मुक्त करणे बाबत कार्यवाही पूर्ण करणे	म. प्रा. वन र अधि. १९६६ चे कलम १२७ (२) अन्वये रस्त्याखालील जागा आरक्षण मुक्त करणे करीता शासनास अहवाल सादर करुन जागा आरक्षण मुक्त झाल्याबाबतची अधिसुचना मे. न्यायालयात सादर करावी लागेल. तथापि या मुळे रस्त्याची अखंडता नष्ट होईल.

उक्त प्रकरणी, सभागृहात झालेल्या चर्चेनूसार याप्रमाणे निर्णय घेण्यात येतो की, भुसंपादन प्रस्ताव मुळातच रद्द झालेला आहे तसेच महानगरपालिकेची आर्थिक स्थिती पाहता **मौजे मेहरुण स.नं.१६९/१अ/१ यातून** जाणाऱ्या ३०.०० मी. रुंद विकास योजना रस्त्याखालील क्षेत्र १८००.०० चौ.मी. संपादन करणे शक्य नाही. तरी प्रशासनातर्फे सादर करण्यात आलेला भूसंपादन प्रस्ताव नामंजूर करण्यात येत आहे. तसेच प्रशासनाने वरील प्रमाणे आरक्षीत जागा आरक्षण मुक्त करणेबाबत शासनाकडेस प्रस्ताव सादर करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप तसेच कायदेशिर अडचणी येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

बहुमताने मंजुर

अनुकुल मते :- ४९ प्रतिकुल मते :- १७
सुचक :- श्री.लढ्ढा नितीन बालमुकुंद
अनुमोदक :- श्री.बालाणी प्रकाश रावलमल

सही /-
(दिपमाला मनोज काळे)
महापौर
जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव

प्रत कार्यवाहीस्तव
मा.आयुक्त, महानगरपालिका, जळगांव.

मे.४ थे सह जिल्हा न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांनी दि.०५/०५/२०२५ रोजी दिलेल्या निर्णयानुसार रक्कम तक्रार हक्क कायम ठेऊन (Under Protest) मे.उच्च न्यायालयात जमा करणे बाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

असा ठराव करणेंत येत आहे की, मंजुर विकास योजना जळगाव (जु.ह) मध्ये आरक्षण क्र. १६३ (प्राथमिक शाळा व क्रिडांगण) या करीता मेहरुण स.नं.४७७ मधील भुखंड क्र. २९,३०,३९,३२,३३,३४,३५ तसेच अभिन्यासातील ७.५० मी. रुंद रस्ता व खुली जागा (भागशः) या जमिनीचे एकुण क्षेत्र ५५२२.०० चौ.मी आरक्षित आहे. या क्षेत्राचे भूसंपादन प्रस्ताव क्र. क्र.एस.आर/२६/८२ भूसंपादन अधिकारी यांचेकडे सादर करण्यात आलेला होता. या भुसंपादन प्रस्तावानुसार विशेष भुसंपादन अधिकारी यांनी भूसंपादन कायदा १८९४ मधील कलम ११ नुसार दि.०२/०२/१९९९ रोजी निवाडा घोषीत करुन सर्व संबंधीत जमिन मालकांना एकुण नुकसान भरपाई रक्कम रु.१७३०७६२/- अदा करुन, सर्व जमिनमालकांकडून जागेचा ताबा प्राप्त करुन घेऊन तत्कालीन नगरपालिकेस हस्तांतरीत केलेली आहे. व तद्नंतर सदरची जागा तत्कालीन नगरपालिकेच्या नावावर लावण्यात आलेली आहे.

उक्त जमिन नगरपालिकेच्या नावावर लागल्यानंतर तत्कालीन न.पा. ठराव क्र.२८९, दि.०८/१०/१९९९ अन्वये सदरची जमिन खान्देश युनियन एज्युकेशन सोसायटी जळगाव या संस्थेस महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगीक नगरी अधिनियम १९६५ चे कलम ९२ अन्वये ०३ वर्ष कराराने आणि त्रिसदस्यीय समिती ठरवेल त्या वार्षिक भाड्यानुसार देणेस मंजुरी देण्यात आलेली आहे. या ठरावानुसार सदर संस्थेने दि.०१/११/१९९९ रोजी करुन दिलेल्या करारनाम्यानुसार आणि तत्कालीन नगरपालिके तर्फे दि.०३/११/१९९९ रोजी केलेल्या ताबापावती द्वारे ताब्यात देण्यात आलेली आहे. उक्त संस्थेस बा.प. क्र.७१५७, दि.११/०२/२००० अन्वये तळघर + तळमजला + पहिला मजला या प्रमाणे शाळेच्या इमारतीस बांधकाम परवानगी दिलेली आहे. आणि भोगवटा प्रमाणपत्र क्र. ४४४१, दि.१४/०५/२००१ अन्वये भोगवटा प्रमाणपत्र निर्गमीत केलेले आहे.

उक्त संस्थेच्या दि.२७/०७/२००१ च्या अर्जानुसार तत्कालीन नगरपालिकेने ठराव क्र.२३५, दि.०३/०८/२००१ पारीत करुन सदरची जमिन उक्त कायद्यातील कलम ९२ नुसार, ९९ वर्षाच्या भाडे कराराने देणे बाबत मान्यता दिलेली आहे. म. उपविभागीय अधिकारी जळगाव भाग जळगाव, सहायक संचालक, नगररचना, महाराष्ट्र शासन, व प्रभारी अधिकारी म.न.पा. जळगाव या अधिका-यांच्या त्रिसदस्यीय समितीने उक्त जमिनीचे सन २००० ते २००२ पर्यंतचे वार्षिक भाडे रु.२,३३,८७०/- व सन २००३ ते २००५ या कालावधी साठी वार्षिक भाडे रु.२,५७,२६०/- या प्रमाणे निश्चित करुन तसे दि.०२/०७/२००३ च्या पत्रान्वये जिल्हाधिकारी तसेच प्रभारी अधिकारी, महानगरपालिका जळगाव यांना कळविले आहे. त्या अनुषंगाने उक्त संस्थेने पावती क्र.१९७०४, दि.०९/०५/२००५ अन्वये दि.०३/११/१९९९ ते दि.३१/०३/२००५ या कालावधीचे जमिनीचे वार्षिक भाडे रु.१३,१८,१३६/- भरलेले दिसुन येतात.

तद्नंतर उक्त संस्थेने दि. २०/०१/२०१० च्या अर्जानुसार ९९ वर्षाच्या भाडेपट्टा कराराने किंवा कायम स्वरुपी मालकी हक्काने देणे बाबत मागणी केलेली आहे. व त्या अनुषंगाने महापालिकेमार्फत स्थापन केलेल्या मुल्यनिर्धारण समितीने जमिनीचे मुल्य रु.२.५४,०२,६८४/- ठरविली आहे. संस्थेच्या पत्रातील मागणीच्या अनुषंगाने जळगाव शहर महानगरपालिकेने महासभा ठराव क्र.५२३, दि.१५/०३/२०१० अन्वये ठराव पारीत केला असुन, भाडेपट्ट्यात दर ०३ वर्षाने १० टक्के भाडेवाढ करुन ९९ वर्षाच्या कराराने भाड्याने द्यावी किंवा महापालिकेने जागा संपादना करीता जी रक्कम अदा केलेली आहे. ती रक्कम व त्यावर १२ टक्के व्याज आकारुन रक्कम, एकुण येणारी रक्कम वसुल करुन, कायम मालकी हक्काचे देण्यात यावी या प्रमाणे पर्यायासह मंजुरी दिलेली आहे.

तद्नंतर उक्त संस्थेने दि.०३/०६/२०१० च्या अर्जानुसार दि.०१/०७/१९८५ च्या शासन निर्णयाप्रमाणे एकूण मुल्यांच्या २५ टक्के रक्कमेवर ८ टक्के दराने भाडे या प्रमाणे येणारी रक्कम भरण्यास तयार असलेबाबत पत्र दिले असून त्या अनुषंगाने जळगाव शहर महानगरपालिकेने महासभा ठाराव क्र.६६५, दि.१८/०६/२०१० अन्वये जमिन संपादनासाठी महापालिकेने केलेला खर्च व त्यावरील सन १९९९ ते २०१० या ११ वर्षाचे येणारे व्याज मिळून जमिनीची अधिमुल्य रक्कम एकुण रु.३३,८२,१०९/- आणि थकीत भाड्याची रक्कम रु.१३,१५,८८५/- वसुल करुन, सदरची जागा उक्त संस्थेस कायम स्वरुपी देण्यास मान्यता दिलेली आहे. त्या अनुषंगाने या कार्यालयाकडील दि.२४/०६/२०१० च्या पत्रान्वये कळविल्यानुसार उक्त संस्थेने थकीत असलेली रक्कम रु.१३,१५,८८५/- पावती क्र.११६५६, दि. २४/०६/२०१० व वरील प्रमाणे ठरविलेली अधिमुल्य रक्कम रु.३३,८२,१०९/- ही पावती क्र.१७६०६, दि.२४/०६/२०१० अन्वये भरलेली आहे. या पावतीवर " जागा कायम स्वरुपी मालकी हक्काने देणेकामी या प्रमाणे नमुद आहे. मात्र तद्नंतर जागा कायम स्वरुपी देण्यात आल्याबाबत दिसुन येत नाही. व आजही सदरची जागा नगरपालिकेच्या नावावर असुन, जागा संस्थेच्या ताब्यात देण्यात आल्यापासून ते आजतागायत या जागेत उक्त संस्थेची भगीरथ स्कुल या स्थानिक नावाने शाळा कार्यन्वीत आहे. या प्रमाणे वस्तुस्थिती आहे.

यापूर्वी कलम ११ नुसार दि.०२/०२/१९९९ रोजी घोषीत निवाड्यानुसार सर्व जमिनीचा मोबदला अदा केलेल्या एकूण रक्कमेत, भुखंड क्र.३२ चे जागा मालकांना सुध्दा रक्कम रु.१,७०,१६६/- इतकी रक्कम अदा झालेली आहे. मात्र भुखंड क्रं. ३२ चे जागा मालक यांनी भूसंपादन कायदा १८९४ मधील कलम २८अ अन्वये भुसंपादन अधिकारी यांचेकडेस पुन्हा अपील अर्ज सादर केला आणि त्या अनुषंगाने भुसंपादन अधिकारी यांनी दि.०२/०१/२०१९ रोजी सुधारीत निवाडा घोषीत करुन भुखंड क्र.३२ ची भूसंपादनाची एकुण रक्कम रु.१७,०३.५८६/- घोषीत केली आहे.

जागा मालक यांनी या दि.०२/०१/२०१९ रोजी घोषीत केलेल्या सुधारीत निवाड्या विरोधात मे.जिल्हाधिकारी जळगाव यांकडेस दि.०५/०२/२०१८ भूसंपादन संदर्भ सादर केला होता. व सदरचा भूसंपादन संदर्भ मे. जिल्हा न्यायालयात एल.ए.आर. नं.९४/२०२१ अन्वये दाखल झाला. या दाव्याचा निकाल, दि.०५/०५/२०२५ रोजी देण्यात आलेला असुन यात जागा मालक यांना रु.३७७२/- प्रती चौ.मी या दरा प्रमाणे भूसंपादनाचा मोबदला रु.१७,८७,९२८/- पुरस्कृत केलेला आहे. या रक्कमेवर ३० टक्के दिलासा रक्कम + इतर व्याज मिळून रक्कम रु.१,२०,९८,७३४/- (अदमासे) या प्रमाणे देण्याचे मे. ४ थे सह जिल्हा न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात दाखल LAR NO.९४/ २०२१ यात दि. ०५/०५/२०२५ रोजी आदेश दिलेला आहे. सदर प्रमाणे आदेशानुसार नमुद रक्कम ही अत्यंत अवाजवी असल्याने या बाबत मे. उच्च न्यायालयात प्रथम अपील क्र.११३३/२०२६ तसेच स्थगिती मिळणे करीता C.A.No. १२१/२०२६ तसेच विलंब माफी करीता C. A. No. १२०/२०२६ या प्रमाणे अपीले दाखल करण्यात आलेले आहे. प्रस्तुत अपीलांनुसार मे. उच्च न्यायालयाने ५३ दिवसाचा विलंब माफी करुन में. जिल्हा न्यायालयाच्या निवाड्यानुसार संपुर्ण रक्कम १२ आठवड्याचे आत भरण्याच्या अटीवर स्थगिती दिलेली आहे. आणि प्रथम अपील सद्यस्थितीत प्रलंबीत आहे. मे. उच्च न्यायालयाने दिलेल्या स्थगीती आदेशा विरोधात अद्याप पर्यंत सर्वोच्च न्यायालयात अपील दाखल करण्यात आलेले नाही.

दरम्यानच्या काळात जागा मालक यांनी मे. जिल्हान्यायालच्या निर्णयाची अंमलबजावणी करीता आणि रक्कमेची वसुली करीता मे. जिल्हा न्यायालयात नियमीत दरखास्त क्र.२०४/२०२५ दाखल केलेली आहे. आणि या दरखास्तीची अंमलबजावणी, दरखास्त दाखल केल्यापासून निरंतर सुरु आहे. प्रस्तुत दरखास्तीत पुढील तारीख दि.१३/०८/२०२६ रोजी असुन या दरखास्तीत दि.१३/०८/२०२६ किंवा त्यापुढे ठेवण्यात येणार असलेल्या सुनावणीच्या दिवशी, दखास्तीत म.न. पा विरुध्द विपरीत आदेश पारीत होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या करीता मे. जिल्हा न्यायालयाने दिलेल्या डिक्रीनुसार रक्कम रु.१,२०,९८,७३४/- ही मे.उच्च न्यायालयात प्रलंबीत असलेल्या प्रथम अपीलातील निकालाच्या अधिन राहुन आणि तक्रार हक्क कायम ठेवून (Under Protest). में.उच्च न्यायालयात जमा करण्यास व रक्कम अदायगी अहवाल मान्यता कामी प्रस्तावित करण्यात आलेले आहे.

सदर प्रस्तावावर सभागृहात झालेल्या चर्चेनूसार उक्त प्रकरणी योग्य त्या वकीलांचा सल्ला घेवून सदर प्रकरणी योग्य तो निर्णय घेणेकामी म.आयुक्त यांना प्राधिकृत करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप तसेच कायदेशिर अडचणी येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

सर्वानुमते मंजुर

अनुकुल मते :- ६६ प्रतिकुल मते :- ००

सुचक :- श्री.लढ्ढा नितीन बालमुकुंद

अनुमोदक :- श्री.बालाणी प्रकाश रावलमल

सही /-

(दिपमाला मनोज काळे)

महापौर

जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव

प्रत कार्यवाहीस्तव

मा.आयुक्त, महानगरपालिका, जळगांव.

जळगांव मनपा क्षेत्रात एलईडी पथदिवे देखभाल दुरुस्ती तसेच CCMS पुरवठा /बसविणे बाबत शासन नियुक्त निविदाधारक यांचेशी करारनामा करणे.

असा ठराव करणेंत येत आहे की, महाराष्ट्र शासन निर्णय क्रं.पथदिवे -२०२५/प्र.क्रं.१८३/नवि-२० दि.२५ जुलै २०२५ राज्यातील सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या क्षेत्रात एनर्जी इफिशियन्सी सर्विसेस लिमिटेड म्हणजेच ईईएसएल च्या माध्यमातून एलईडी पथदिवे बसविण्यासाठी नगर विकास विभागामार्फत दिनांक १४/०२/२०१८ रोजी एस्क्रो तत्त्वावर ईईएसएल सोबत ७ वर्षासाठी करण्यात आलेल्या करारनाम्याचा कालावधी दिनाकं १३/२/२०२५ रोजी संपुष्ठात आला असल्याने राज्य शासनाने जावक क्रं नपप्रसं/एलईडी पथदिवे/प्र.क्रं./२०२५ /का.७/८००६ दि. ३०/१०/२०२५ अन्वये कळवून सदर आदेशात महाराष्ट्रातील सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्था मधील विद्यमान एलईडी पथदिवे देखभाल दुरुस्ती तसेच नवीन एलईडी लाईट्स आणि CCMS चा पुरवठा स्थापना आणि देखभाल दुरुस्ती बाबत नव्याने १० वर्षा करीता राज्य स्तरावर निविदाधारक १) M/S BAC Infratech Pvt. २) M/S Vinci Global Pvt.Ltd (JV) या संस्थे बरोबर करारनामा करुन पुढील कार्यवाही करणे बाबत सुचित केलेले आहे. तसेच दि.३०/१०/२०२५ चे शासनाचे पत्रानुसार महाराष्ट्र सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थातील एलईडी पथदिवे बाबत शासनाने नियुक्त केलेल्या कंपनीशी करारनामा करणे मुद्या क्रं. ३ अन्वये ड वर्ग महानगरपालिकेस बंधनकारक केलेले आहे.

परंतु तत्पुर्वी शासन निर्णयानुसार ईईएसएल कंपनीचा करारनामा संपुष्ठात आल्याने जळगांव महानगरपालिकेमार्फत ई-निविदा प्रक्रिया राबवून मक्तेदार तिरुपती इलेक्ट्रीकल्स सेल्स अॅण्ड सर्व्हिस औरंगाबाद यांना एलईडी पथदिवे देखभाल दुरुस्ती कामी जशमनपा/कार्या/विद्युत/५१ दि.०६/११/२०२५ अन्वये १२ महिन्या करीता (१ वर्षा करीता) एलईडी पथदिवेच्या देखभाल दुरुस्ती कामी खालील दर निहायप्रमाणे कार्यादेश निर्गमित करण्यात आलेला आहे. तसेच निविदा सूचना अटी व शर्तीमधील मुद्दा क्रमांक ७ नुसार महानगरपालिका आयुक्त यांच्या निर्देशनानुसार देण्यात येणारा मक्ता नियमित करण्याचा अथवा रद्द करण्याचा अधिकार सक्षम प्राधिकरण यांनी राखून ठेवलेला आहे असे नमुद केलेले आहे.

एकूण पथदिवे संख्या	प्रति फिक्चर प्रति नग (CCMS वगळून)	एकुण मासीक दर	एकुण वार्षीक दर
१७८२१	२१/-	३७४२४१/-	४४९०८९२/-

वरीलप्रमाणे व शासनाने नियुक्त एजन्सीमार्फतचे काम करणे बंधनकारक केल्याने मनपा जा.क्रं/विद्युत/३०८ दि. १७/११/२०२५ अन्वये शासनाचे मार्गदर्शन मागविण्यात आले. त्या अनुषंगाने शासनामार्फत जावक क्रं नपप्रसं/एलईडी पथदिवे/प्र.क्रं./२०२५ /का.७/९०५४ दि. ०४/१२/२०२५ नुसार शासनाचे ऊर्जा संवर्धन धोरण दि. २२ जुन २०१७ च्या शासन निर्णया द्वारे विहित केलेले आहे. या धोरणानुसार नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्रं. पदिवे-२०२५/ प्र.क्रं.१८३/नवि-२० दि. २५ जुलै २०२५ च्या शासन निर्णया नुसार राज्यतील सर्व नागरी स्थानीक स्वराज्य् संस्था मधील क्षेत्रात पथदिवे कार्यान्वीत करणे बाबत निर्णय घेतलेला आहे. त्या अनुषंगाने राज्यात दरांमध्ये एक सुत्रात व किफायतशीरपणा राहण्यासाठी व सक्षमपणे पथदिवे यंत्रणा कार्यान्वीत करण्यासाठी शासन निर्णयाप्रमाणे संचालनालय स्तरावरती आवश्यक निविदा प्रक्रिया राबविली आहे. सदर निविदा ही पथदिव्यांचे संचालन व देखभाल दुरुस्ती समग्रपणे होणेसाठी आवश्यक मनुष्यबळ, साहित् बदल,CCMS बसविणे व चालविणे, पथदिवे व्यवस्थेची प्रतिबंधात्मक देखभाल दुरुस्ती करणे व यासाठी काम योग्य मानंकनाप्रमाणे पार पाडण्यासाठी आवश्यक तक्रार निवारण व अहवाल प्रणाली निर्माण करणे या व्यापक स्वरुपात कार्य असलेली राज्य स्तरीय निविदा प्रक्रिया करण्यात आलेली आहे. राज्य स्तरावर M/S BAC Infratech Pvt. and M/S Vinci Global Pvt.Ltd (JV) या संस्थेची निविदा कमी दराची असल्यामुळे अंतिम करण्यात आलेली आहे.

सबब राज्यस्तरीय एलईडी पथदिवे प्रकल्पा अंतर्गत देखभाल ,दुरुस्ती तसेच एलईडी पथदिवे व CCMS पुरवठा/बसविणे करिता M/S BAC Infratech Pvt. and M/S Vinci Global Pvt.Ltd (JV) यांच्या विद्यमान एलईडी पथदिवेचे संचालन व देखभाल तसेच एलईडी पथदिवे व CCMS यांचा पुरवठा, प्रतिष्ठापन व देखभाल निविदाधाकांशी करारनामा करण्याची प्रक्रिया त्वरित पुर्ण करुन निविदेच्या अटीप्रमाणे सर्व पथदिवे मालमत्ता व जबाबदा-या सुरळीतरीत्या हंस्तातरीत करण्याची आवश्यक कार्यवाही करावी असे नमुद केलेले होते.

त्या अनुषंगाने शासनाने नव्याने नियुक्त केलेली एजन्सीकडुन काम करणेबाबत धोरणात्मक निर्णय होणे करिता शासनाने नव्याने नियुक्त केलेली एजन्सीसोबत करारनामा करणेस म.महासभेची मंजुरी होणेस्तव धोरणात्मक निर्णय घेणे कामी सादर केले असता म.महासभा यांचेमार्फत मा. महासभा ठराव क्र. १६ दि. १५/०४/२०२६ अन्वये प्रशासनाकडुन सादर करण्यात आलेला प्रस्ताव नामंजूर करुन सदरच्या ठरावात सदरचे काम हे महानगरपालिका प्रशासनाने आपले स्तरावर निविदा प्रक्रिया राबवावी तसेच राज्य शासनाने निश्चित करून दिलेल्या एजन्सीचे मंजूर दरापेक्षा कमी दर प्राप्त झाल्यास

मनपाचा आर्थिक फायदा होऊ शकतो या बाबीचा विचार करता जळगाव शहरातील एलईडी पथदिव्यांची देखभाल व दुरुस्ती करणेकामी प्रशासनाने नव्याने निविदा प्रक्रिया राबविणे या आशयाचा ठराव म.महासभेने संमत केलेला आहे.

त्यानुसार पुढील निविदा प्रक्रिया करणे कामी सविस्तर प्रस्ताव सादर करण्यात आल असता दि.१४/०५/२०२६ रोती मा.आयुक्त सो. यांच्या मान्यतेने उपरोक्त बाबींचा विचार करता शासनाने दिलेल्या निर्देशांचे व म.महासभेने केलेल्या ठरावानुसार प्रशासनाला पथदिवे देखभाल दुरुस्तीच्या कामाबाबत अंमलबजावणीत अडचण निर्माण झालेली असल्याने म.संचालक तथा

आयुक्त नगरपरिषद प्रशासन संचालनालय,मुंबई यांना मनपा पत्र जा.क्रं/विद्युत/४७ दि.१५/०५/२०२६ अन्वये प्रस्तृत प्रकरणी उचित मार्गदर्शन व आदेश व्हावेत या संदर्भात पत्रव्यवहार करण्यात आलेला आहे.

त्या अनुषंगाने म.सह.आयुक्त नगरपरिषद प्रशासन संचालनालय,मुबंई यांचे जावक क्रं. नपप्रसं/एलईडी पथदिवे/ प्र.क्रं./२०२५/का.७/३३५ दि.०५/०६/२०२६ अन्वये पत्र प्राप्त झालेले असून पत्रात शासन निर्णय दि. २५ जुलै २०२५ नुसार अंतिम झालेल्या निविदा धारकासोबत तपशीलवार बाबी (Specification) व दरानुसार स्वतंत्रपणे करारनामे करून त्यानुसार कार्यवाही करणे सर्व ड वर्ग महानगरपालिका व सर्व नगरपालिका/नगरपंचायती यांना बंधनकारक करण्यात आलेले असल्याचे नमुद केलेले आहे. तसेच येणाऱ्या पावसाळ्यात नागरिकांचा त्रास कमी होण्यासाठी राज्यस्तरीय एलईडी पथदिवे प्रकल्पांतर्गत देखभाल, दुरुस्ती तसेच एलईडी पथदिवे व CCMS पुरवठा/बसविणे करिता M/s BAC Infratech Pvt. Ltd. आणि M/s Vinci Global Pvt. Ltd. (JV) यांच्याशी विद्यमान एलईडी पथदिवेचे संचालन व देखभाल तसेच एलईडी पथदिवे व CCMS यांचा पुरवठा, प्रतिष्ठापन व देखभाल निविदाधारकांशी करारनामा करण्याची प्रक्रिया त्वरित पूर्ण करून निविदेच्या अटीप्रमाणे सर्व पथदिवे मालमत्ता व जबाबदाऱ्या सुरळीतरीत्या हस्तांतरित करण्याची आवश्यक कार्यवाही करणे व करत असलेल्या कार्यवाहीची माहिती नगरपरिषद प्रशासन संचालनालय,मुबंई यांना कळविणेबाबत सुचित करण्यात आलेले आहे.

त्या अनुषंगाने शासनाने नव्याने नियुक्त केलेली एजन्सीसोबत करारनामा करणेबाबत धोरणात्मक निर्णय होणे आवश्यक आहे.

सद्यस्थितीत महानगरपालिकेमार्फत जळगांव शहरात बसविण्यात आलेले एलईडी पथदिवे संख्या खालीलप्रमाणे.

ईईएसएलमार्फत बसविण्यात आलेले एलईडी पथदिव्यांची देखभाल व दुरुस्ती चा मक्ता देणेबाबत	१७८२१ नग	मक्तेदार तिरुपती इलेक्ट्रिकल्स सेल्स ॲण्ड सर्व्हिस, औरंगाबाद यांना मनपा /पवडी/ कार्या/विद्युत/ ५१ दि.०६/११/२०२५ कार्यादेश निर्गमीत करण्यात आलेला आहे.
आमदार/खासदार/मनपा व इतर निधी ९ मीटर/१२ मीटर उंचीचे पोलवर १५०७ नग एलईडी पथदिवे (बगीच्या, शौचालय इत्यादी) व इतर निधी अंतर्गत १४१५ नग एलईडी)	२९२२ नग	सद्यस्थितीत मनपामार्फत देखभाल दुरुस्ती करण्यात येत आहे.
बांभोरी पुला पासुन ते बुलेट शो रुम (गोदावरी कॉलेज) पर्यंत एलईडी पथदिवे - ७४८ नग	७४८ नग	सद्यस्थितीत मनपामार्फत देखभाल दुरुस्ती करण्यात येत आहे.
हायमास्ट पथदिवे संख्या (१२ मी वरील उंचीचे)	२१२ नग	सद्यस्थितीत मनपामार्फत देखभाल दुरुस्ती करण्यात येत आहे.
बालाजी आसोसीएट नागपुर यांचेमार्फत बसविण्यात आलेले एलईडी पथदिवे	२९५० नग	मनपा/पवडी/कार्या/ विद्युत/ ८२ दि. १६/०२ /२०२४. पुढील ५ वर्ष हमी कालावधीत आहे.
वरद इलेक्ट्रीकल्स वर्क्स, जळगांव यांचेमार्फत बसविण्यात आलेले एलईडी पथदिवे	३६० नग	मनपा/पवडी/कार्या/विद्युत/ १७ दि.१४/०७/२०२५. पुढील ३ वर्ष हमी कालावधीत आहे.
एकुण	२५०१३	
ईईएसएलमार्फत जळगांव शहरात एकुण १३७ CCMS बसविण्यात आलेले आहे.		

शासनाने दि.१०/१०/२०२५ रोजी सदर कंपनीस कार्यादेश दिलेले असून सदर कार्यादेशामधील Annexure-१ मधील Sr.No १ नुसार Comprehensive Operation and Maintenance of existing LED streetlight & CCMS in all ULBs of maharastra for the period of ten years यानुसार Work Description असून प्रति फिक्चर प्रति महिना याप्रमाणे रु. ११९/- मात्र दर निश्चित केलेले आहे. तसेच Annexure-१ मधील Sr.No २ ते २.५३ अन्वये New streetlight, LED light,Cable, ६ mtr/९mtr/११mtr pole, pole Foundation व इतर अनुषंगीक कामे करावयाची असल्यास त्यानुसार दर निश्चित केलेले आहेत. त्या दरानुसार महानगरपालिकेस पोल व इतर अनुषंगीक कामे शासन निर्णयानुसार करता येतील.

सद्यस्थितीत महानगरपालिका हद्दीत वरीलप्रमाणे एकुण २५०१३ पथदिवेपैकी ३३१० एलईडी पथदिवेचा हमी कालावधी सुरु असल्याने २१७०३ एलईडी पथदिवे व १३७ CCMS यंत्रणा यांचे नियोजित देखभाल दुरुस्ती कामाचा मक्ता शासन नियुक्त कंपनीस देता येईल.

SR NO	Description of Work /Item (s)	याबाबतचे दर रक्कम रु. ११९/- मात्र प्रति फिक्चर प्रति महा दर CCMS सह देण्यात आलेले आहे.
१.००	Comprehensive operation and maintenance of existing LED street lights and CCMS in all ULBs of Maharashtra for the period of १० years as per the scope of work	

सदर दराप्रमाणे शहरातील एकुण एलईडी फिक्चर संख्या २१७०३ नग विचार केला असता खालीलप्रमाणे खर्च अपेक्षीत आहे. (बालाजी असोशीएट, नागपुर यांचे २९५० एलईडी पथदिवे,वरद इलेक्ट्रीकल्स वर्क्स,जळगांव यांचे ३६० असे एकुण ३३१० एलईडी पथदिवे वगळून)

एकुण पथदिवे संख्या	प्रति फिक्चर प्रति नग (CCMS सह)	एकुण मासीक दर	एकुण वार्षीक दर	दहा वर्षाकरिताचा दर
२१७०३	११९/-	२५८२६५७/-	३०९९१८८४/-	३०९९१८८४०/-

शासन करारनामा नुसार वरील प्रमाणे वर्ष निहाय खर्च अपेक्षित आहे तसेच प्रत्येक वर्षी ३ % खर्चात वाढ होणार आहे

वरील प्रमाणे खर्च हा शासन नियुक्त कंपनीकडील Description of Work /Item (s) मधील SR NO-१ बाबत असून उर्वरित २ ते २.५३ नुसार कामे करावयाची झाल्यास त्याचा वेगळा खर्च महानगरपालिकेस करावा लागणार आहे. सदर Description of Work /Item (s) २ ते २.५३ बाबत जिल्हादर सूचीनुसार नियमित निविद प्रक्रिया करून कामे करता येऊ शकतात

वरील प्रमाणे Description Of Work /Item(s) नुसार अवलोकन केले असता सद्यस्थितीत जळगांव शहर महानगरपालिकेमार्फत शहरात एकुण १३७ CCMS यंत्रणा बसविण्यात आलेले असून शासनाने निश्चित केलेल्या एजन्सीनुसार SI No १ मधील दर हे LED Operation Maintenance व. CCMS Operation Maintenance करीता एकत्रित घेण्यात आलेले आहे. तसेच दरम्यानच्या काळात M/s BAC Infratech Pvt. Ltd. आणि M/s Vinci Global Pvt. Ltd. (JV) यांचेमार्फत दिनांक ०८/०५/२०२६ रोजीच्या पत्रान्वये त्यांनी मुद्दे निहाय बाबीनुसार कामे करण्यास तयार असलेबाबत कळविण्यात आलेले असून सदर पत्रातील अ.न. २ मधील मुद्या क्रं. ४ मध्ये शासन नियुक्त मक्तेदार यांनी जळगांव शहर महानगरपालिकेमार्फत बसविण्यात आलेले अस्तित्वात असलेले बंद एलईडी पथदिवे व CCMS सिस्टीम ही कुठलेही शुल्क न आकारता दुरुस्ती व बदलवुन देणे बाबत नमुद केलेले आहे.

शासनामार्फत नियुक्त एजन्सी सोबत करावयाचा करारनामातील sr.no १ नुसार Comprehensive operation and maintenance of existing LED street lights and CCMS in all ULBs of Maharashtra for the period of १० years as per the scope of work उर्वरीत sr.no १.०० ते sr.no २.५३ पावेतोचे तक्ता तसेच सदर दराची तुलना करणे कामी जिल्हादरसूची सन २०२२-२३ नुसार तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे

SI. NO.	DESCRIPTION OF WORK/ITEM(s)	No of Qty	Units	Rate (InRS.)	2022-23 CSR ITEM No	Rate (In RS.)
1.00	Comprehensive operation and maintenance of existing LED street lights and CCMS in all ULBs of Maharashtra for the period of 10 years as per the scope of work	21703	Per light per month			119
2.00	Item rates for retrofitting and new street lights in all ULBs of maharashtra					
2.01	Supplying 4 core 16 sq.mm size cable for maintenance with required labour for trenching with required glands & ligs complete	1.00	Per meter	200	1-3-10	693
2.02	Providing & erecting epoxy straight through joint outdoor/indoor for LT xlpe armored cable 2.5 to 16 sq.mm with necessary material as per specification.	1.00	Nos	1915	-	-
2.03	Making trench for detection of cable fault	1.00	Per meter	219	-	-
2.04	Supplying & erecting FRP box of size 300mm x 200mm x 125 mm, 2.7 mm thick complete on pole/wall as per specification.	1.00	Nos	775	7-8-10	786
2.05	Providing & erecting 6m high (clear height) galvanized octagonal pole with foundation bolts having bottom of 130mm A/F, top 70 mm A/F on provided foundation as per specification no. OH-PL/OPL. Hinges should be provided for termination door and SPMCB should be provided safety purpose.	1.00	Each	13900	8-2-12	15067
2.06	Providing & erecting 7 m high (clear height) galvanized octagonal pole with foundation bolts having bottom of 130mm A/F, top 70 mm A/F on provided foundation as per specification no. OH-PL/OPL. Hinges should be provided for termination door and SPMCB should be provided safety purpose.	1.00	Each	15875	8-2-13	17094
2.07	Providing & erecting 9m high (clear height) galvanized octagonal pole with foundation bolts having bottom of 155mm A/F, top 70 mm A/F on provided foundation as per specification no. OH-PL/OPL. Hinges should be provided for termination door and SPMCB should be provided safety purpose.	1.00	Each	21847	8-2-16	21691
2.08	Providing & erecting 11m high (clear height) galvanized octagonal pole with foundation bolts having bottom of 210mm A/F, top 90 mm A/F on provided foundation as per specification no. OH-PL/OPL. Hinges should be provided for termination door and SPMCB should be provided safety purpose.	1.00	Each	30000	8-2-19	29994
2.09	Making Cement concrete foundation including excavation (45 x 45 x 120) cm deep in 1:3:6 cement concrete, 20 to 25mm stone metal, (45 x 45 x 45) cm, 45 cm dia x 45 cm hight plinth duly plastered, with necessary curing and finishing complete, (for 6m pole)	1.00	Each	2019	16-3-2	1301
2.10	Making Cement concrete foundation including excavation (60 x 60 x 150) cm deep in 1:3:6 cement concrete, 20 to 25mm stone metal, (45 x 45 x 45) cm, 45 cm dia x 45 cm hight plinth duly plastered, with necessary curing and finishing complete, (for 6 to 9 m pole)	1.00	Each	3283	16-3-3	2033

2.11	Making Cement concrete foundation including excavation (60 x 60) cm deep 1/6, length in 1:3:6 cement concrete, 20 to 25mm stone metal, (45 x 45 x 45) cm, 45 cm dia x 45 cm hight plinth duly plastered, with necessary curing and finishing complete, (for above 9m pole)	1.00	Each	3536	16-3-4	2177
2.12	Supplying, installing and testing pipe type earthing with 40mm dia. G.I. pipe or 20mm dia. G.I. Rod complete with all accessories of GI material & recording the results as per specification no. EA-EP	1.00	Each	1537	9-1-4	1500
2.13	Providing and erecting galvanized 1000mm single arm sword type bracket with FRP dome and ball as per specification no. OPL-PL/BKT	1.00	Each	1579		
2.14	Supplying and erecting street light bracket for erection of Single fitting made from 40mm dia. 'B' class G.I. pipe 1.0m in length along with pole cap of 300mm length 100mm dia. duly welded as per specification no. PG-BKT/SLB	1.00	Each	1000	2-7-5	1043
2.15	Street light Triple arm bracket for erection of Triple fitting made from 40mm dia. 'B' class G.I. pipe 1.0m in length along with pole cap of 300mm length 100mm dia. duly welded	1.00	Each	1528	-	-
2.16	Street light Four / Square bracket for erection of Floodlight of any wattage.	1.00	Each	1536	-	-
2.17	Supplying and erecting LED street light fitting 25W as per specification Mention in Tender	1.00	Each	1850	2-4-2	2090
2.18	Supplying and erecting LED street light fitting 35W as per specification Mention in Tender	1.00	Each	2415	2-4-3	2570
2.19	Supplying and erecting LED street light fitting 50W as per specification Mention in Tender	1.00	Each	3457	2-4-4	4117
2.20:	Supplying and erecting LED street light fitting 70-75W as per specification Mention in Tender	1.00	Each	5700	2-4-6	5945
2.21	Supplying and erecting LED street light fitting 100-110W as per specification Mention in Tender	1.00	Each	7315	2-4-8	8152
2.22	Supplying and erecting LED street light fitting 120W as per specification Mention in Tender	1.00	Each	9975	2-4-9	9799
2.23	Supplying and erecting LED street light fitting 160-170W as per specification Mention in Tender	1.00	Each	11766	2-4-11	13799
2.24	Supplying and erecting LED flood light fitting Max 70W as per specification Mention in Tender	1.00	Each	6394	2-4-14	5846
2.25	Supplying and erecting LED flood light fitting Max 100W as per specification Mention in Tender	1.00	Each	7576	2-4-15	8246
2.26	Supplying and erecting LED flood light fitting Max 120W as per specification Mention in Tender	1.00	Each	10009	2-4-16	9846
2.27	Supplying and erecting LED flood light fitting Max 195W as per specification Mention in Tender	1.00	Each	17660	2-4-18	15846
2.28	Supplying, erecting & terminating FR XLPE insulated, galvanized steel formed wire armored (strip) cable, 1100V 4 core 16sq.mm aluminum conductor complete erected with glands & lugs on wall/trusses/pole or laid in provided trench/pipe as per specification no. CB-LT/AL	1.00	Per meter	215	7-1-29	211
2.29	Supplying, erecting & terminating FR XLPE insulated, galvanized steel formed wire armored (strip) cable, 1100V 31/2 core 16sq.mm aluminum conductor complete erected with glands & lugs on wall/trusses/pole or laid in provided trench/pipe as per specification no. CB-LT/AL	1.00	Per meter	297	7-1-16	293
2.30	Supplying, erecting & terminating FR XLPE insulated, galvanized steel formed wire armored (strip) cable, 1100V 31/2 core 50sq.mm aluminum conductor complete erected with glands & lugs on wall/trusses/pole or laid in provided trench/pipe as per specification no. CB-LT/AL	1.00	Per meter	386	7-1-17	381
2.31:	Making trench in soft soil having 0.75m depth and minimum 0.3m width for laying provided cables up to voltage level of 1.1KV complete as per specification no. CW-EXN-CTR	1.00	Per meter	189	16-1-1	161
2.32	Making trench in Hard murum /Tar Road having 0.75m depth and minimum 0.3m width for laying provided cables up to voltage level 1.1KV cable complete as per specification no. CW-EXN-CTR	1.00	Per meter	219	16-1-2	199
2.33	Supplying & erecting G.I. pipe 'A' class 40mm dia. for enclosing XLPE armored cable on wall/pole as per specification no. CB-CE	1.00	Per meter	344	7-6-2	337
2.34:	Supplying & laying (including excavation) reinforced cement concrete pipe of NP-2 class of 150mm diameter in proper line, level and slope including providing and fixing collars in cement mortar 1:2 and curing etc. complete.	1.00	Per meter	545	7-6-5	569
2.35	Supplying and laying (including excavation of suitable width & depth up to 90cm 50mm outside dia. double wall corrugated pipes (DWC) of HDPE for enclosing cable below ground/road surface, complete.	1.00	Per meter	200	7-6-9	210
2.36:	Supplying and erecting mains with WP 4 \times 4sq.mm, 1.1KV grade aluminum PVC insulated and PVC sheathed wires on G.I. bearer wire no. 8SWG complete erected with required size of porcelain reel insulators and 16SWG G.I. binding wire.	1.00	Per meter	138	1-4-6	142
2.37:	Supplying and erecting mains with WP 3 \times 6sq.mm, 1.1KV grade aluminum PVC insulated and PVC sheathed wires on G.I. bearer wire no. 8SWG complete erected with required size of porcelain reel insulators and 16SWG G.I. binding wire.	1.00	Per meter	142	1-4-5	147

2.38:	SITC of 1 phase CCMS panel with 10-year data charges, cloud & software charges as per specification.	1.00	Nos	42000	-	-
2.39:	SITC of 3 phase CCMS panel with 10-year data charges, cloud & software charges as per specification.	1.00	Nos	64000	-	-
2.40:	Buyback of old SV/MV/MH fitting of any watt	1.00	Nos	60	-	-
2.41:	Buyback of old SV/MV/MH floodlight fitting of any watt	1.00	Nos	60	-	-
2.42:	Buyback of old LED fitting Up to 18Watt	1.00	Nos	60	-	-
2.43:	Buyback of old LED fitting above 18-watt up to 24Watt	1.00	Nos	60	-	-
2.44:	Buyback of old LED fitting above 24Watts} up to 35Watt	1.00	Nos	60	-	-
2.45:	Buyback of old LED fitting above 35Watts} up to 45Watt	1.00	Nos	60	-	-
2.46:	Buyback of old LED fitting of 70Watt	1.00	Nos	60	-	-
2.47:	Buyback of old LED fitting above 70-watt up to 110Watt	1.00	Nos	70	-	-
2.48:	Buyback of old LED fitting above 110Watts} up to 140Watt	1.00	Nos	70	-	-
2.49:	Buyback of old LED fitting of 190Watt	1.00	Nos	70	-	-
2.50:	Buyback of old LED Floodlight fitting up to 110Watt	1.00	Nos	70	-	-
2.51:	Buyback of old LED Floodlight fitting above 110-watt up to 210Watt	1.00	Nos	70	-	-
2.52:	Buyback of old 1 phase CCMS panel	1.00	Nos	120	-	-
2.53:	Buyback of old 3 phase CCMS panel	1.00	Nos	140	-	-

शासन नियुक्त कंपनी मार्फत sr.no १ नुसार Comprehensive operation and maintenance of existing LED street lights and CCMS in all ULBs of Maharashtra for the period of १० years as per the scope of work करणे कामी या खर्चाचा तक्ता वर नमुदनुसार आहे. तसेच शासन करारनामा नुसार वरील प्रमाणे वर्ष निहाय खर्च अपेक्षित आहे तसेच प्रत्येक वर्षी ३ % खर्चात वाढ होणार आहे व SR.NO २ ते SR.NO २.५३ नुसार कामे ही महानगरपालिकेत मेंटेनन्स व्यतिरिक्त नवीन ITEM निहाय करावी लागणार आहे.

तसेच सदर बाबत SR.NO २ ते SR.NO २.५३ अन्वये शासनाने केलेल्या करारातील दर जर महानगरपालिकेने केलेल्या निविदेपेक्षा कमी असल्यास शासनाने केलेल्या करारानुसार अनुज्ञेय काम करणे योग्य राहील.

सबब करीता राज्य शासनाने जावक क्रं नपप्रसं/एलईडी पथदिवे/प्र.क्रं./२०२५ /का.७/८००६ दि. ३०/१०/२०२५ अन्वये महानगरपालिका यांना सुचित करुन करारनामा मुद्या क्रं. ३ नुसार 'ड' वर्ग महानगरपालिका यांना शासन नियुक्त कंपनीसोबत करारनामा करणे कामी बंधनकारक करण्यात आलेले आहे. तसेच महानगरपालिकेमार्फतचा वरील प्रमाणे पत्रव्यवहार व मा.महासभा ठराव याबाबत शासनास मार्गदर्शन मागितले असता शासनाने पत्र क्र. नपप्रसं/एलईडी पथदिवे/प्र.क्र./२०२५ /का.७/९०५४ दि. ४ डिसेंबर २०२५ व पत्र क्र.नपप्रसं/एलईडी पथदिवे/प्र.क्र./२०२५/का.७/३३४ दि. ५ जून २०२६ अन्वये शासनाने शासन नियुक्त कंपनी मार्फतच काम करणे बाबत बंधनकारक करण्यात आलेले आहे.

करिता शासनाने नव्याने नियुक्त केलेली एजन्सीकडुन काम करणेस व करारनामातील Description Of Work /Item(s) मधील sr.no १.०० ते २.५३ नुसार संपुर्ण काम करणेस तसेच सदर कंपनी मार्फत करारनामा करुन कार्यादेश देण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप तसेच कायदेशिर अडचणी येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

सर्वानुमते मंजुर

अनुकुल मते :- ६५ प्रतिकुल मते :- ०१

सुचक :- श्री.सुर्यवंशी रुद्रेंद्र ऊर्फ दिपक प्रभाकर

अनुमोदक :- श्री.बालाणी प्रकाश रावलमल

सही /-

(दिपमाला मनोज काळे)

महापौर

जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव

प्रत कार्यवाहीस्तव

मा.आयुक्त, महानगरपालिका, जळगांव.